दैनिक
# समर्थ राजयोग
SAMARTH RAJYOG
https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com
वैभव विवेक स्वामी
संपादक
राजमान्य, राजशक्ती
No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.
बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय दैनिक...
बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी वर्ष - ६ वे अंक -२९९ बुधवार दि.०८ जुलै २०२६ 98 22 62 85 21 आरएनआय -एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ । किंमत ३ रू । पाने ४
Beed Daily Marathi Year-6th Issue-299 Wednesday, Dt.08 July 2026 98 22 62 85 21 RNI - MAHMAR/2020/79801 Price 3 Rs. Pages 4

# कोकणात पावसाचा धुमाकूळ तर मराठवाडा अजूनही प्रतीक्षेत!

## पालघरमध्ये २०३.३ मिमी पावसाची नोंद पण मराठवाड्यात अनेक जिल्ह्यांत १ ते ६ मिमीच पाऊस.!!

बीड । वेदांत स्वामी

राज्यात गेल्या २४ तासांत अनेक भागांत पावसाने दमदार हजेरी लावली असताना मराठवाडा मात्र अद्यापही समाधानकारक पावसाच्या प्रतीक्षेत आहे. कोकण, मुंबई परिसर, ठाणे, रायगड आणि पुणे जिल्ह्यांत मुसळधार पाऊस झाला, तर मराठवाड्यातील बहुतांश जिल्ह्यांमध्ये अत्यल्प पावसाची नोंद झाल्याने खरीप हंगामाबाबत शेतकऱ्यांची चिंता कायम आहे.

राज्य आपत्कालीन कार्य केंद्राने दिलेल्या माहितीनुसार, पालघर जिल्ह्यात सर्वाधिक २०३.३ मिलीमीटर पावसाची नोंद झाली. त्यानंतर ठाणे (११६.४ मिमी), रायगड (१०८.७ मिमी), मुंबई उपनगर (९०.४ मिमी) आणि पुणे (७०.९ मिमी) येथे जोरदार पाऊस झाला. रत्नागिरी (५८.४), कोल्हापूर (४७.७) आणि सातारा (४६.६) जिल्ह्यांमध्येही चांगला पाऊस झाला आहे.एका भागात अतिवृष्टी तर दुसऱ्या भागात पावसाची प्रतीक्षा...हवामान विभागाच्या पुढील अंदाजाकडे आता मराठवाड्यातील शेतकरी आणि नागरिकांचे लक्ष लागले असून, येत्या काही दिवसांत दमदार पाऊस झाल्यास खरीप हंगामाला मोठा दिलासा मिळू शकतो. मात्र सध्याची आकडेवारी पाहता राज्याच्या एका भागात अतिवृष्टी तर दुसऱ्या भागात पावसाची प्रतीक्षा, असे विषम चित्र महाराष्ट्रात दिसून येत आहे.





### पावसाची ही प्रादेशिक विषमता काय संकट उभे करणार..?

खरीप पेरणीनंतर पिकांच्या वाढीसाठी आवश्यक असलेला सलग आणि समाधानकारक पाऊस अद्याप न झाल्याने शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. काही भागांत पिके उगवली असली तरी ओलाव्याअभावी त्यांची वाढ खुंटण्याची भीती व्यक्त केली जात आहे. पावसातील ही प्रादेशिक विषमता शेतीसह पिण्याच्या पाण्याच्या उपलब्धतेवरही परिणाम करू शकते, अशी शक्यता तज्ज्ञांकडून व्यक्त होत आहे.

### मराठवाडा दमदार पावसाच्या प्रतीक्षेत..!

मराठवाड्यातील चित्र पूर्णतः वेगळे दिसून आले. छत्रपती संभाजीनगरमध्ये १४.१ मिमी, धाराशिवमध्ये ६.८ मिमी, बीडमध्ये ६.२ मिमी, जालना ५.६ मिमी, परभणी १ मिमी, हिंगोली १.९ मिमी, लातूर ०.७ मिमी आणि नांदेडमध्ये केवळ ०.५ मिमी पावसाची नोंद झाली. या आकडेवारीवरून मराठवाड्यात अद्याप दमदार पावसाने हजेरी लावलेली नसल्याचे स्पष्ट होत आहे.

## नागरिकांना मतदार नोंदणी प्रक्रियेत शिवसैनिकांनी सहकार्य करावे : सचिन मुळूक

बीड ।प्रतिनिधी

केज व परळी विधानसभा मतदारसंघातील सर्व पात्र मतदारांनी मतदार यादीत आपले नाव कायम राहण्यासाठी सुरू असलेली एसआयआर नोंदणी प्रक्रिया विहित मुदतीत पूर्ण करावी. तसेच बीएलओ यांना आवश्यक कागदपत्रे उपलब्ध करून द्यावीत.उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली शिवसेना जनतेच्या हितासाठी सातत्याने कार्यरत असून शिवसैनिकांनी आपल्या परिसरातील नागरिकांना एसआयआर नोंदणी प्रक्रियेबाबत मार्गदर्शन करून त्यांना आवश्यक सहकार्य करावे, असे आवाहन शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांनी केले आहे.



निवडणूक आयोगाच्या वतीने मतदार यादी अद्ययावत करण्यासाठी एसआयआर नोंदणी मोहीम सुरू आहे. या मोहिमेअंतर्गत प्रत्येक मतदाराने आवश्यक अर्ज भरून ओळख व वास्तव्याचे आवश्यक पुरावे बीएलओकडे जमा करणे गरजेचे आहे. यामुळे मतदार यादी अधिक अचूक व अद्ययावत राहण्यास मदत होणार

पान २ वर...

## बीड नगरपालिकेत सत्ताधाऱ्यांची फक्त चर्चाच ठोस
## कुठलेच अद्याप काम नाही - सौ.सारिका क्षीरसागर

बीड ।प्रतिनिधी

बीड नगरपरिषदेत गेल्या दोन ते अडीच महिन्यांनंतर नुकतीच एक बैठक पार पडली. मात्र, या बैठकीत केवळ चर्चा झाली असून शहराचा कोणताही ठोस विकास आराखडा किंवा प्रलंबित मागण्यांवर काम झाले नसल्याचा आरोप बीड न.प.च्या भाजप गटनेत्या डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांनी केला आहे. स्थायी समिती आणि सर्वसाधारण बैठकीतही मांडलेले प्रस्ताव अद्याप एका पाऊलही पुढे सरकले नाहीत, अशी खंत त्यांनी व्यक्त केली.

बीड नगरपरिषदेत सोमवारी (दि.६) झालेल्या स्थायी समितीच्या बैठकीत डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांनी शहरातील अनेक विकासाचे मुद्दे मांडले. बैठकीनंतर माध्यमांशी संवाद साधला. त्या म्हणाल्या, मान्सूनपूर्व नालेसफाईसाठी १८ नाल्यांची यादी देण्यात आली होती. या कामासाठी ३८ ते ४० लाख रुपयांची तरतूद असूनही, प्रत्यक्षात ६ ते ७ ठिकाणी पाहणी केली असता नाल्यांची परिस्थिती जैसे थे आहे. शहरात मध्य मान्सून सुरू असतानाही नालेसफाई पूर्ण झालेली नाही. बीड शहराच्या सुरक्षेसाठी एलईडी लाईट्सची मोठी गरज आहे, मात्र यावर नवीन कोणताही निर्णय झालेला नाही. तसेच, कलेक्टर ऑफिसकडून मंजूर झालेल्या १ कोटीच्या निधीतून ४० हायमास्ट बसवणे गरजेचे आहे. यामध्ये कोणतीही अफरातफर किंवा बदल न करता जुन्या यादीनुसारच काम व्हावे, अशी मागणी त्यांनी केली. १५ व्या वित्त आयोगांतर्गत आलेला सुमारे २६ कोटी रुपयांचा निधी पाणीपुरवठा आणि स्वच्छतेसाठी वापरणे अपेक्षित आहे. परंतु, हा निधी नेमका कुठे आणि कसा वाटप केला जाणार, याचे कोणतेही स्पष्ट उत्तर नगरसेवकांना मिळालेले नाही.



पान २ वर...

### स्व.अजितदादा पवारांचे नाव खराब करण्याचे काम बीड न.प.कडून सुरूय...

आम्ही नगरसेवक होऊन आठ महिने झाले, पण प्रभागातील लोकांना काय द्यायचे ? हा प्रश्न पडला आहे. केवळ फेसबुक आणि इंस्टाग्रामवर टीका करणाऱ्या ५-१० लोकांपेक्षा, प्रत्यक्षात येऊन शेकडो नागरिक आमच्याकडे तक्रारी करत आहेत. नगराध्यक्ष आणि त्यांच्या टीमची मानसिकता काम करण्याची दिसत नाही. अजितदादा पवार यांच्या नावावर लोकांनी यांना निवडून दिले, पण त्यांच्याकडून दादांच्या नावाचा आणि पक्षाचा नावलौकिक खराब केला जात आहे, अशी संतप्त प्रतिक्रिया डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांनी दिली.

## गेवराई पोलीसांची अवैध दारू वाहतुकीवर कारवाई



### कारसह आरोपीस ताब्यात घेत ६ लाख २८,८००/-रू चा मुद्देमाल जप्त

बीड ।प्रतिनिधी

पोलीस अधीक्षक श्री. नवनती कॉंवत, यांच्या अवैध धंद्यावर कडक कारवाई करण्याच्या आदेशानुसार गेवराई पोलीसांनी पथक तयार करून विशेष मोहीम राबवून दिनांक ०७.०७.२०२६ रोजी सायंकाळी १७:४० वा. चे सुमारास गेवराई शहरात केलेल्या कारवाईत एक तेश्रज्ञीुरसशप कंपनीच्या पोलो कार कारमधून अवैधरित्या विदेशी दारूची वाहतुक करताना एका आरोपीस कारसह ताब्यात घेण्यात आले. त्याच्या कारमध्ये ७ विविध कंपनीच्या एकूण १३५ बाटल्या

पान २ वर...

## लातूर जिल्ह्यात सरासरीच्या १६.६ टक्के पाऊस
## प्रकल्पांमध्ये १७ टक्के पाणीसाठा

लातूर ।प्रतिनिधी

जिल्ह्याची वार्षिक सरासरी ७०६ मिमी इतकी असून, ६ जुलैपर्यंत प्रत्यक्ष ११७.२ मिमी पावसाची नोंद झाली आहे. हे प्रमाण वार्षिक सरासरीच्या १६.६ टक्के आहे. जून महिन्याचा विचार केला असता, जूनमधील सर्वसाधारण १३५ मिमी पावसाच्या तुलनेत प्रत्यक्षात ९५ मिमी पाऊस पडला आहे. त्यामुळे यंदाचा जून महिना सरासरीपेक्षा कमी राहिला आहे.

जिल्ह्यातील मोठे, मध्यम व लघु प्रकल्पांमध्ये मिळून सध्या एकूण १७ टक्के पाणीसाठा शिल्लक आहे. मांजरा प्रकल्पात १८ टक्के, तर निम्न तेरणा प्रकल्पात ३२.१६ टक्के पाणीसाठा आहे. तसेच मध्यम ८ प्रकल्पांमध्ये १२.२७ टक्के, १३५ लघुप्रकल्पांमध्ये १२.५१ टक्के पाणीसाठा उपलब्ध आहे.

**खरीप पेरणी: १८.२६ टक्के क्षेत्रावर पेरण्या पूर्ण**

जिल्ह्यात खरिपाचे सर्वसाधारण क्षेत्र ५.८६ लाख हेक्टर इतके आहे. सद्यस्थितीला एकूण क्षेत्रापैकी १८.२६% म्हणजेच सुमारे १.०७ लाख हेक्टर क्षेत्रावर पेरणी पूर्ण झाली आहे. यंदाच्या हंगामात मुख्य पीक म्हणून सोयाबीनची मोठ्या प्रमाणावर पेरणी झाली असून, त्यापाठोपाठ तुरीची लागवड करण्यात येत आहे.

**पाणी टंचाई निवारणार्थ युद्धपातळीवर उपाययोजना**

जिल्ह्यात पाणी टंचाई भासू नये म्हणून प्रशासनाकडून आवश्यक उपाययोजना सुरू करण्यात आल्या आहेत. टंचाईग्रस्त भागात सध्या ३ टँकर्स सुरू असून, १८७ खाजगी विहिरींचे अधिग्रहण करण्यात आले आहे. दरम्यान, महानगरपालिका आणि नगरपालिका क्षेत्रात

पान २ वर...

## राज्यव्यापी ३०० कोटी वृक्ष लागवड अभियान बैठक संपन्न
### गावच्या सरपंचांनी वृक्षारोपणासाठी मागणी केल्यास
## रोपे उपलब्ध करुन द्यावी -जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन

बीड ।प्रतिनिधी

राज्यात वर्ष २०२६ च्या पावसाळ्यात ३०० कोटी वृक्षारोपण मोहीम राबविण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर बीड जिल्ह्यातही वृक्ष लागवड अभियान प्रभावीपणे राबविण्यासाठी संबंधित यंत्रणांनी दिलेल्या उद्दीष्टाप्रमाणे योग्य नियोजन व कार्यवाही करावी, तसेच ग्रामीण भागात पर्यावरण रक्षणासाठी लोकसहभाग वाढविण्यावर भर देण्यात येत आहे. तरी एखाद्या गावचा सरपंच गावात झाडे लावण्यास इच्छुक असेल आणि त्यांनी प्रशासनाकडे मागणी केली, तर त्यांना कोणतीही दिरंगाई न करता थेट रोपे उपलब्ध करून द्यावीत, अशा सूचना जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी दिल्या.

जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित वृक्ष लागवड अभियानाबाबत बैठक घेण्यात आली. यावेळी ते बोलत होते. या बैठकीला जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहेमान, उपजिल्हाधिकारी प्रभोदय मुळे, ग्लोबल विकास ट्रस्टचे संस्थापक मयंक गांधी, वन परिक्षेत्र अधिकारी ए.डी. मुंडे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुभाष साळवे आणि उपवन संरक्षक उमेश बिराजदार प्रत्यक्ष तर बीड व अंबाजोगाईचे उपविभागीय अधिकारी ऑनलाईन उपस्थित होते.

जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन म्हणाले, पावसाळ्यात ३०० कोटी

पान २ वर...



बैठकीत जिल्हाधिकारी यांचे यंत्रणांना नियोजनबद्ध कारवाईचे आदेश

## वक्फ प्रकरणांचा निपटारा करण्यासाठी दोन निवृत्त न्यायाधीश नेमणार.!
## काही विभागांचे कामकाज आता हज हाऊस येथून चालणार..!!



सीएसनगर (औरंगाबाद)

राज्य वक्फ मंडळाचे कामकाज अधिक गतिमान व्हावे म्हणून मोठे बदल करण्यात येणार असून प्रकरणांचा निपटारा लवकर व्हावा म्हणून दोन निवृत्त न्यायाधीश यांच्या नेतृत्वात बारा कायदेशीर सहायकांची टीम गठीत करण्यात येणार आहे,अशी माहिती राज्य वक्फ मंडळाचे अध्यक्ष समीर काझी यांनी एका पत्रकार परिषदेत दिली.त्याच बरोबर जागे अभावी पाणचक्कीतील दहा पैकी पाच विभागाचे कामकाज हज हाऊस येथून चालविण्यात येणार आहे.त्यासाठी शासनाने मंजुरी दिली आहे,अशी माहिती ही यावेळी दिली.

वक्फ मंडळाची दोन दिवसीय बैठक हज हाऊस येथे पार पडली. बैठकीच्या पहिल्या दिवशी,पहिल्या दिवशी वक्फशी संबंधित २१ प्रकरणांची सुनावणी झाली. ही प्रकरणे दोन्ही पक्षांमधील तडजोडीतून सोडवण्यात आली. वक्फ बोर्डाच्या इतिहासात प्रथमच, दोन्ही पक्षांच्या संमतीने ११ वक्फ विवाद जलदगतीने सोडवण्यात आले. याशिवाय, बोर्डाच्या बैठकीत नियमित बदल अहवाल, विविध योजना आणि वक्फ मालमत्तांच्या विकासासंदर्भातही निर्णय घेण्यात आले. ही माहिती वक्फ बोर्डाचे अध्यक्ष समीर काझी यांनी शुक्रवारी एका पत्रकार परिषदेत दिली. काझी यांनी सांगितले की, वक्फशी संबंधित प्रकरणांची सुनावणी करण्यासाठी आणि विविध न्यायालये व प्राधिकरणांमध्ये वक्फशी संबंधित निर्णय सुनिश्चित करण्यासाठी विधी विभागात दोन निवृत्त दिवाणी न्यायाधीशांची नियुक्ती करण्याचा निर्णयही बैठकीत घेण्यात आला. त्यांनी सांगितले की, या न्यायाधीशांना मदत करण्यासाठी १२ सहाय्यकांचीही नियुक्ती

पान २ वर...

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
Bureau of Indian Standards
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777
6 x 6.5

## संपादकीय....

# ही अनास्था काय कामाची!

यापूर्वी विधिमंडळाचे अधिवेशन असले की सत्ताधाऱ्यांना धडकी भरायची. विरोधी पक्ष नगण्य असला तरी ते तलवारी उपसून सरकारला कोंडीत पकडण्यासाठी सज्ज असायचे. आम्ही आत्तापर्यंत ७० ते ७५ अधिवेशने पाहिली. परंतु यावेळचे अधिवेशन म्हणजे निव्वळ सोपस्कार होते.

विधिमंडळाचे अधिवेशन या आठवड्याअगोदर संपुष्टात येत आहे. या अधिवेशनात काय झाले यापेक्षा काय झाले नाही याचीच चर्चा सुरू आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अधिवेशन सुरू होण्यापूर्वी सत्ताधारी भाजप मंत्र्यांची व आमदारांची बैठक घेऊन या अधिवेशनात १०० टक्के उपस्थिती असावी असे स्पष्ट निर्देश दिले होते. परंतु अधिवेशन संपत असतानाही मंत्री व आमदार सभागृहात उपस्थित राहात नाहीत, अशी तक्रार भाजपच्या प्रदेशाध्यक्षांनी केली आहे. ही अनास्था काय कामाची! मुख्यमंत्र्यांनी यावर स्पष्ट भूमिका मांडून दांड्या मारणाऱ्या मंत्र्यांचे सरळ-सरळ राजीनामे घेतले पाहिजेत, तर आमदारांच्या प्रगती पुस्तकावर कडक शेरे मारणे आवश्यक आहे. गैरहजर राहणाऱ्या आमदारांना कुठल्याही महामंडळावर नियुक्त न करता प्रामाणिकपणे काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना पुढे आणले पाहिजे. आयाराम-गयारामांचे वर्चस्व न वाढवता निष्ठावंतांना न्याय दिला पाहिजे.

यापूर्वी विधिमंडळाचे अधिवेशन असले की सत्ताधाऱ्यांना धडकी भरायची. विरोधी पक्ष नगण्य असला तरी ते तलवारी उपसून सरकारला कोंडीत पकडण्यासाठी सज्ज असायचे. आम्ही आत्तापर्यंत ७० ते ७५ अधिवेशने पाहिली. परंतु यावेळचे अधिवेशन म्हणजे निव्वळ सोपस्कार होते. पूर्वी अधिवेशनात मंत्री, आमदारांची १०० टक्के उपस्थिती असायची. सध्या तर १० टक्केही उपस्थिती नव्हती. अधिवेशन असले की विभागातील प्रश्न सुटायचे. परंतु आता निवडून आलेल्या आमदारांनाच प्रश्न माहीत नसल्याने त्यावर चर्चा होत नाही. आदल्या दिवशी एखादा प्रसंग झाला तर त्यावर फक्त चर्चा करायची, त्यातून निष्पन्न काही होत नाही. पूर्वी स्थगन प्रस्तावाला महत्त्व असायचे. या स्थगन प्रस्तावावर उत्तर देताना मंत्र्यांची फटफजिती व्हायची. परंतु आता तर स्थगन प्रस्ताव चर्चेला येत नाही. आले तर ते लक्षवेधीच्या नावावर. स्थगन हा विरोधी पक्षाचा खरा रामबाण असतो. परंतु त्यावर चर्चा होत नाही आणि केवळ निवेदन करा एवढेच सांगितले जाते. मुंबईत एकाच कुटुंबातील चार जणांचा विषप्रयोगाने मृत्यू झाला. त्यांचा कशाने मृत्यू झाला याचा साधा उलगडा आजपर्यंत झाला नाही. त्यावर विरोधकांनी स्थगन प्रस्ताव दिला. परंतु या एवढ्या मोठ्या विषयावर चर्चा नाही.

विरोधी पक्ष निष्प्रभ असल्याने मतदानाची मागणी करत नाही. सभागृहात प्रश्नोत्तराच्या वेळी थोडीफार उपस्थिती असते. परंतु त्यानंतर संपूर्ण सभागृह ओस पडल्याचे चित्र दिसते. आता काय झाले आहे. हाऊसमध्ये चर्चा करण्याऐवजी ही आमदार मंडळी इलेक्ट्रॉनिक कॅमेऱ्याकडे जाऊन चर्चा करतात. यापूर्वी सभागृह हे सार्वभौम असायचे. ते स्थैर्य आता बिघडले आहे. २९३ च्या चर्चेला संबंधित मंत्र्याने सभागृहात उपस्थित राहून उत्तर देणे आवश्यक आहे. परंतु तेथे तर सभागृहात त्या खात्याचा मंत्रीच उपस्थित नसतो ही शोकांतिका म्हटली पाहिजे. विधानमंडळ हे कायदे मंडळ आहे. या कायदे मंडळात अनेक महत्त्वाची बिले चर्चेला येत असतात. पूर्वी एखादे बिल मंजूर व्हायचे असेल तर ३ ते ४ दिवस त्यावर चर्चा व्हायची.

पान १ वरून..

**गेवराई पोलीसांची ...**

विदेशी दारू किंमत एकूण २९,८००/-रू चा साठा जप्त करण्यात आला असून पोलीस ठाणे गेवराई येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रीया चालू आहे.

सदर कारवाई मा. नवनीत काँवत, पोलीस अधीक्षक, बीड, मा.समीर शेख, अपर पोलीस अधीक्षक, बीड व श्री. अनिल कटके, उप विभागीय पोलीस अधिकारी, गेवराई यांच्या मार्गदर्शनाखाली श्री. किशोर पवार, पोलीस निरीक्षक गेवराई, पोकॉ/१४६५ विनोद कुटे, पोकॉ/१६३ अनिकेत खेडकर, चापोकॉ/२०२८ राजेंद्र चोरमले यांनी सदर कारवाईत यांनी सहभाग घेतला.

**नागरिकांना मतदार...**

असून, पात्र मतदारांचा मतदानाचा अधिकार सुरक्षित राहील.

केज व परळी मतदारसंघातील नागरिकांनी या प्रक्रियेकडे गांभीर्याने पाहावे. बीएलओ घरपोच भेट देत असल्यास त्यांना आवश्यक माहिती व कागदपत्रे तातडीने उपलब्ध करून द्यावीत. तसेच ज्यांची नोंदणी अद्याप पूर्ण झालेली नाही, त्यांनी स्वतःहून बीएलओशी संपर्क साधून प्रक्रिया पूर्ण करणे गरजेचे आहे.या मतदारसंघातील शिवसैनिकांनी आपल्या गावात, वॉर्डात आणि बूथनिहाय नागरिकांना एसआयआर नोंदणी प्रक्रियेची माहिती देऊन आवश्यक ते मार्गदर्शन करावे. ज्येष्ठ नागरिक, महिला, दिव्यांग आणि गरजू मतदारांना अर्ज भरणे व कागदपत्रे सादर करण्यासाठी मदत करावी. मतदार यादीतील एकही पात्र नागरिक वंचित राहू नये, यासाठी सर्वांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहनही शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांनी केले.

**राज्यव्यापी ३०० कोटी...**

वृक्षारोपण या अभियानांतर्गत ग्लोबल विकास ट्रस्टच्या माध्यमातून बीड जिल्ह्यात जवळपास ३० लाख वृक्षांची लागवड केली जाणार आहे. वृक्ष लागवडीमध्ये केवळ झाडे लावणे नव्हे, तर त्यांचे संगोपन करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. ही बाब लक्षात घेऊन ग्लोबल विकास ट्रस्ट या झाडांच्या संगोपनाचीही जबाबदारी घेणार असल्याचेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले. शासकीय यंत्रणांना रोपे विनामुल्य पुरविली जाणार आहेत. यासाठी जिल्ह्यात सध्या आष्टी येथील रोपवाटिकेत पुरेशा प्रमाणात रोपे उपलब्ध आहेत. ग्लोबल विकास ट्रस्टसोबत सामंजस्य करार केला जात असून प्रशासनाकडून गरजेनुसार आणि उपलब्धतेनुसार त्यांना परळी व अंबाजोगाई परिसरात वृक्षारोपणासाठी रोपे पुरवली जाणार आहेत. ग्रामीण भागातील शाळांमध्ये वृक्ष लागवड करताना घाईगडबड न करता, तेथील जागेची उपलब्धता पाहूनच शाळांची निवड करावी, असे निर्देशही जिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी दिले.

वृक्ष लागवड करण्यासाठी यंत्रणानिहाय उद्दीष्टांचे वाटप :

जिल्हाभरात वन विभाग आणि सामाजिक वनीकरण विभाग यांच्याकडे लागवडी योग्य एकुण २९.५० लक्ष रोपे उपलब्ध आहेत. यामध्ये उद्दीष्टानूसार वाटपात सामाजिक वनीकरण विभाग १४ लाख, वन विभाग प्रादेशिक ६ लाख ५० हजार, वन्य जीव विभाग १ लाख ८ हजार, महसूल विभाग ५० हजार, पोलिस व इकोबटालियन विभाग ५० हजार, ग्रामविकास विभाग २ लाख ४१ हजार, नगरपरिषद व नगर पंचायत विभाग ५० हजार, जिल्हा परिषद शिक्षण विभाग १ लाख तर अशासकीय संस्था ३ लाख आणि कृषी विभागास पांडूरंग फुंडकर राज्य योजनेतून ५ लाख व जिल्हा रेशीम विभागाला राज्य योजनेतून ३१ लक्ष या प्रमाणे शासनाने दिलेल्या सुचनेप्रमाणे उद्दीष्ट वाटप करण्यात आले आहे.

**बीड नगरपालिकेत ....**

हा निधी योग्य पद्धतीने वापरल्यास लाईट बिल, स्वच्छता आणि डम्पिंग ग्राउंडसारखे मोठे प्रश्न सुटू शकतात. शहरात गरजेच्या तुलनेत मुरूम खरेदी केवळ २० ते ३० टक्केच होऊ शकली आहे. प्रत्येक प्रभागात समान पातळीवर ८० लाखांच्या क्रॉसिंग आणि पाईपलाईनचे योग्य डिस्ट्रीब्यूशन व्हावे, अशीही मागणी केली. सध्या सुरु असलेल्या बैठका केवळ नावापुरत्या असून बीडच्या जनतेला कोणत्याही मूलभूत सुविधा मिळत नसल्याचे सांगत, नागरिकांनी आता डोळे

पान १ वरून..

उघडून ही परिस्थिती पाहण्याची गरज असल्याचे त्यांनी म्हटले आहे. तसेच, सध्या बीड नगरपरिषदेचा कारभार प्रभारी मुख्याधिकाऱ्यांकडे आहे. ते गेवराई नगरपरिषदेचे कामही पाहत आहेत. बीड शहरासाठी आधीचे मुख्याधिकारी शैलेश फडसे यांच्यासारखे सक्षम आणि कायमस्वरूपी मुख्याधिकारी मिळावेत, अशी मागणी डॉ.क्षीरसागर यांनी केली.

प्रभारी मुख्याधिकाऱ्यांचा सत्कार

बीड शहरातील विविध समस्या डॉ.सारिकाताई क्षीरसागरांसह नगरसेवकांनी मांडल्या. त्यानंतर प्रभारी मुख्याधिकारी विक्रम मांडूरके यांचा डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांच्यासह नगरसेवकांनी सत्कार केला. यावेळी पदाधिकारी, कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

**लातूर जिल्ह्यात...**

उपलब्ध पाणीसाठ्याचे योग्य नियोजन करण्यात आले असून, डिसेंबर अखेरपर्यंत पुरेल एवढा पाणीसाठा सुरक्षित उपलब्ध आहे. त्यामुळे नागरिकांनी घाबरून न जाता पाण्याचा काटकसरीने वापर करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

चारा उपलब्धता: पशुधनासाठी १२३ दिवसांचा साठा सुरक्षित

जिल्ह्यातील पशुधनासाठी चाऱ्याची पुरेशी उपलब्धता आहे. जिल्ह्यात सध्या १२३ दिवस (सुमारे चार महिने) पुरेल इतका चारा साठा उपलब्ध आहे. त्यामुळे पशुपालकांनी चिंतेचे कारण नाही. जिल्हा प्रशासन जिल्ह्यातील सर्व परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवून आहे. नागरिकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये. केवळ अधिकृत माहितीवरच विश्वास ठेवावा आणि पाणी तसेच चाऱ्याचा अपव्यय टाळून प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनाच्यावतीने करण्यात आले आहे.

**वक्फ प्रकरणांचा निपटारा..**

केली जाईल. विधी विभागातील या न्यायाधीशांच्या मार्गदर्शनाखाली, हे पथक कनिष्ठ न्यायालये, उच्च न्यायालय, सर्वोच्च न्यायालय आणि वक्फ प्राधिकरणात वक्फ प्रकरणे आणि विवाद वक्फ बोर्डाच्या बाजूने सोडवण्यासाठी प्रयत्न करेल.काझींनी पुढे सांगितले की, महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांमध्ये नोंदणी आणि आवश्यक कागदपत्रे व नोंदींच्या अभावामुळे मशिदी आणि दर्गे पाडले जात आहेत. केवळ वेळेवर नोंदी आणि कागदपत्रांच्या अभावामुळेच मशिदी आणि दर्गे धोक्यात आले आहेत. त्यामुळे, मशिदी आणि दर्ग्यांना अतिक्रमणापासून वाचवण्यासाठी महाराष्ट्र वक्फ बोर्डातर्फे एक विशेष कृती दल (टास्क फोर्स) स्थापन करण्याचा निर्णयही बैठकीत घेण्यात आला. या कृती दलामध्ये चार्टर्ड अकाउंटंट आणि विधी विभागाच्या कर्मचाऱ्यांचा समावेश असेल. हे कृती दल प्रत्येक मशीद आणि दर्ग्याला भेट देऊन मालकी हक्काची कागदपत्रे, वक्फ नोंदणी आणि इतर जमिनीच्या कागदपत्रांची पडताळणी करण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांची भेट घेईल. जर मशीद आणि दर्गा समित्यांच्या जबाबदार व्यक्तींकडे आवश्यक कागदपत्रे नसतील, तर ती तयार करण्यासाठी हे कृती दल मदत करेल. या संदर्भात, काझींनी सांगितले की १,६०० वक्फ संस्थांची नोंदणी प्रलंबित आहे. केवळ कागदपत्रांच्या अभावामुळे या १,६०० वक्फ मालमत्तांच्या नोंदणीस विलंब होत आहे. महाराष्ट्र वक्फ बोर्डाने प्राधिकरणाच्या निर्देशानुसार चार वक्फ संस्थांची नोंदणी केली आहे. काझींनी सांगितले की, या संदर्भात २५ जून रोजी एका एजन्सीला बोलावण्यात आले होते. त्याचप्रमाणे, वक्फ कामांना गती देण्यासाठी, वक्फ अधिकाऱ्यांना २१ दिवसांच्या आत प्रकरणे निकाली काढण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. २१ दिवसांनंतर अधिकाऱ्यांसोबत आढावा घेतला जाईल. याशिवाय, वक्फ प्रकरणे पूर्ण होतील याची खात्री करण्यासाठी, वक्फ कार्यालयात एका तपास अधिकाऱ्याची नियुक्ती करण्याचा निर्णय घेण्यात आला. ते वक्फ बोर्ड कार्यालयाच्या दैनंदिन कामकाजावर देखरेख ठेवतील आणि त्यानुसार कारवाई केली जाईल. दोन दिवसीय बैठकीत बोर्ड सदस्य ए.यू. पठाण, हसनेन शाकिर,मौलाना अथर इफ्तेखार हाश्मी, मुख्य कार्यकारी अधिकारी फय्याज खान,विशेष अधीक्षक खुसरो खान यांच्यासह अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.

# पृथ्वीचे सौंदर्य सिमेंटच्या जंगलात नव्हे तर वनांच्या जंगलात दडलेले आहे - प्रा.डॉ. नामदेव सानप

## वन महोत्सव निमित्त शासकीय ग्रंथालय कार्यालयात वृक्षारोपण कार्यक्रम संपन्न

छत्रपती संभाजीनगर ।प्रतिनिधी

पृथ्वीचे सौंदर्य सिमेंटच्या जंगलात नव्हे तर वनांच्या जंगलात दडलेले आहे हे ओळखून प्रत्येक व्यक्तीने वन संपत्तीची जोपासना करण्याची आवश्यकता आहे. असे मत प्राचार्य डॉ. नामदेव सानप यांनी व्यक्त केले.

छत्रपती संभाजी नगर येथील शासकीय ग्रंथालय, सावित्रीमाई महिला महाविद्यालय आणि मॉडर्न महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त




विद्यमाने वन महोत्सव निमित्त ग्रंथालय परिसरात वृक्षारोपणाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या प्रसंगी प्राचार्य डॉ. नामदेव सानप हे बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सहाय्यक ग्रंथालय संचालक सुनील हुसे हे होते तर व्यासपीठावर शासकीय ग्रंथालय अधिकारी संतोष जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी सहाय्यक ग्रंथालय संचालक सुनील हुसे म्हणाले की, निसर्गाचा समतोल राखण्यासाठी पर्यावरणाचा समतोल राखणं अत्यंत आवश्यक आहे. यासाठी वनसंपत्तीमध्ये वाढ होण्याची गरज आहे. नागरिकांनी वनसंपत्तीचे महत्त्व लक्षात घेऊन आपले योगदान द्यायला हवे. शासकीय ग्रंथालय अधिकारी संतोष जाधव म्हणाले की, मानवी जीवनात निरोगी व समृद्ध आरोग्याची अत्यंत आवश्यकता असते आणि ते प्राप्त करण्यासाठी निसर्गाचा समतोल आवश्यक असतो आणि निसर्गाचा समतोल टिकून ठेवण्यासाठी वनसंपत्तीची आवश्यकता असते हे ओळखून वनांचं संरक्षण व जोपासना करण्याची आवश्यकता आहे असे म्हटले.यावेळी मान्यवरांच्या हस्ते ग्रंथालय परिसरात विविध फळझाडांची लागवड करण्यात आली. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी प्रा.ज्योती मोरे यांनी केले

# श्री संत एकनाथ महाराज पालखी सोहळ्यात हजारो भाविकांनी घेतला चरणसेवेचा लाभ

छत्रपती संभाजीनगर ।प्रतिनिधी

श्री संत एकनाथ महाराज पालखी सोहळ्यानिमित्त पैठण येथील श्री संत एकनाथ महाराज मंदिर परिसरात हजारो वारकरी भाविकांसाठी चरणसेवा व मोफत वैद्यकीय सेवा शिबिराचे आयोजन करण्यात आले. वारकरी संप्रदायातील सेवा हाच परमधर्म या मूल्याला अनुसरून राबविण्यात आलेल्या या उपक्रमाला भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.




मुख्यमंत्री मा.देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून तसेच मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाचे प्रमुख रामेश्वर नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष, जिल्हाधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर तसेच शिवा ट्रस्ट संचलित यशवंतराव चव्हाण आयुर्वेद महाविद्यालय व रुग्णालय आणि एमजीएम स्कूल ऑफ फिजिओथेरपी यांच्या संयुक्त विद्यमाने आज हा सेवाभावी उपक्रम राबविण्यात आला.

कार्यक्रमाचे उद्घाटन श्री संत एकनाथ महाराजांचे वंशज श्री. रघुनाथ महाराज गोसावी (पालखीवाले) यांच्या हस्ते झाले. विविध प्रशासकीय, राजकीय व सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांनी उपक्रमास भेट देऊन सेवाभावी कार्याचे कौतुक केले.

या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष, जिल्हाधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर, यशवंतराव चव्हाण आयुर्वेद महाविद्यालय व रुग्णालय, एमजीएम स्कूल ऑफ फिजिओथेरपी महाविद्यालयाचे पदाधिकारी, डॉक्टर, प्राध्यापक, विद्यार्थी तसेच श्री. श्याम क्षीरसागर आणि श्री. गजानन कांबळे यांचे विशेष सहकार्य लाभले.

उपक्रमाचे प्रमुख समन्वयक डॉ. बालाजी गोरे, वैद्यकीय अधिकारी, मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष, छत्रपती संभाजीनगर यांनी संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन व समन्वय केले. वारकरी भाविकांना सुरक्षित, निरोगी आणि आनंददायी वारीचा अनुभव मिळावा, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. समाजहितासाठी अशा सेवाभावी व आरोग्यविषयक उपक्रमांचे आयोजन भविष्यातही सातत्याने करण्यात येणार असल्याचे त्यांनी नमूद केले.

# मतदार यादी विशेष सखोल पुनरीक्षण अंतर्गत जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते यांनी दिली घरभेट

धुळे ।प्रतिनिधी

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार सुरू असलेल्या मतदार यादी विशेष सखोल पुनरीक्षण (डखठ) कार्यक्रमांतर्गत जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते यांनी धुळे शहरातील नटराज चित्रपट गृह, शांतीनगर परिसरात प्रत्यक्ष घरभेट देऊन मतदार पडताळणी प्रक्रियेची पाहणी केली. तसेच नागरिकांशी संवाद साधला.

यावेळी अपर जिल्हाधिकारी सुभाष बोरकर, उपविभागीय अधिकारी रोहन कुवर , महानगरपालिका अतिरिक्त आयुक्त करुणा डहाळे, उप जिल्हा निवडणूक अधिकारी गंगाराम तळपाडे, जिल्हा कार्यक्रम अधिकारी अजय फडोळ ,अपर तहसीलदार वैशाली हिंगे, नगरसेवक प्रतीक



**मतदार पडताळणी प्रक्रियेची केली पाहणी, नागरिकांशी साधला संवाद**

कर्पे , छोटू थोरात, माजी महापौर प्रदीप कर्पे, जयश्री अहिरराव, मतदार नोंदणी अधिकारी किशोर कदम आदी उपस्थित होते.

# मुक्त कृषि अभ्यासक्रमाला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

### सौ. के. एस. के. (काकू) कृषि महाविद्यालयात प्रवेश सुरू

बीड । प्रतिनिधी

कृषी क्षेत्रात कौशल्याधारित शिक्षण घेऊन रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी निर्माण करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी सौ. के. एस. के. (काकू) कृषि महाविद्यालय, म्हसोबा फाटा, नगर रोड, बीड येथे मुक्त कृषि अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेस उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. १० वी व १२ वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी झेरॉक्स कागदपत्रांवर प्रवेश सुरू असून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन महाविद्यालय प्रशासनाने केले आहे.

अभ्यासक्रमामध्ये पीक व्यवस्थापन, रेशीम उद्योग, रोपवाटिका व्यवस्थापन, कीड व रोग व्यवस्थापन, सेंद्रिय शेती, फलोत्पादन, कृषी व्यवसाय व्यवस्थापन, माळी प्रशिक्षण, कृषी पत्रकारिता, कृषी उद्योजकता, कृषी प्रक्रिया तसेच डिजिटल कृषी आणि आधुनिक शेती तंत्रज्ञानाचे प्रात्यक्षिकांसह प्रशिक्षण दिले जाते. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये व्यावसायिक कौशल्य विकसित होऊन रोजगार व स्वयंरोजगाराच्या विविध संधी उपलब्ध होतात.

संस्थेचे सहसचिव डॉ. गोविंद साळुंके आणि महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. पी. मोरे यांनी अधिकाधिक विद्यार्थ्यांनी या कौशल्याधारित शिक्षणाचा लाभ घेऊन कृषी क्षेत्रात यशस्वी करिअर घडवावे, असे आवाहन केले आहे.

संपर्क : प्रा. बी. बी. तांबोळकर - ९८२३८२८६४५ प्रा. ए. पी. ढोरमारे - ९६०४८३३७१५ प्रा. सौ. एस. एम. डाके - ७०२०५६४६१०

# गेवराई पोलीसांची जुगार अड्ड्यावर कारवाई

## सहा जुगारी ताब्यात घेऊन ४ लाख २५,०००/-रू चा मुद्देमाल केला जप्त



बीड ।प्रतिनिधी

पोलीस अधीक्षक श्री. नवनती काँवत, यांच्या अवैध धंद्यावर कडक कारवाई करण्याच्या आदेशानुसार गेवराई पोलीसांनी पथक तयार करून दिनांक ०६.०७.२०२६ रोजी सायंकाळी १८:०० वा. चे सुमारास अंतरवली जाणाऱ्या पांदन रस्त्यालगत देवपिंप्री शिवारतील गायरान जमीनीतील गोठ्यामध्ये तीर्रट नावाचा जुगारावर अचानक छापा मारला असता सदर ठिकाणी ०६ इसम जुगार खेळत असताना मिळून आले. त्याना ताब्यात घेऊन त्यांचेकडून रोख रक्कम व मोटार सायकल असे एकूण ४,२५,०००/-रू चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सरकार तर्फे फिर्यादीवरून पोलीस ठाणे गवेराई येथे गुरनं. ४११/२०२२६, कलम-१२(अ) म.जु.का. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून गुन्ह्याचा पुढील तपास पोह/२०२६ राठोड हे करत आहेत.सदर कारवाई मा. नवनीत काँवत, पोलीस अधीक्षक, बीड, मा.समीर शेख, अपर पोलीस अधीक्षक, बीड व श्री. अनिल कटके, उप विभागीय पोलीस अधिकारी, गेवराई यांच्या मार्गदर्शनाखाली श्री. किशोर पवार, पोलीस निरीक्षक गेवराई, पोउपनि. अप्पासाहेब रोकडे, पोह सुंदर राठोड, पोह रविंद्र राऊत, पोकॉ धनंजय सुळ, पोकॉ रामराजे यांनी सदर कारवाईत यांनी सहभाग घेतला.

# २ दिवसांचे लग्न ४ लाखांचा चुराडा

## बोगस लग्न टोळीचा शेवगावच्या नवरदेवाला दणका..!

अहिल्यानगर/ प्रशांत बाफना

लग्न जुळवून देण्याच्या नावाखाली चार लाख रुपयांची आर्थिक फसवणूक झाल्याचा आरोप करत शेवगाव तालुक्यातील बालमटाकळी येथील युवकाने सोमवार दि. ६ रोजी शेवगाव पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. विवाहानंतर अवघ्या दोन दिवसांत नवरी निघून गेल्याने हा प्रकार उघडकीस आल्याचा दावा तक्रारदाराने केला आहे.

तक्रारीनुसार, बालमटाकळी येथील ज्ञानेश्वर महादेव कडूळे हे नेवासा परिसरात कामानिमित्त असताना वैजापूर तालुक्यातील जातेगाव येथील ज्ञानदेव मिरगे यांच्याशी ओळख झाली. त्यांनी लग्नासाठी मुलगी असल्याचे सांगत तिचे आई-वडील नसून मावशीने तिचा सांभाळ केल्याची माहिती दिली. त्यानंतर ज्योती राजू गायकवाड, सुमनबाई साबळे आणि ज्ञानदेव मिरगे यांनी मध्यस्थी करत विवाह ठरवून त्यासाठी चार लाख रुपये घेतल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. यानंतर जालना जिल्ह्यातील भोकरदन तालुक्यातील नळणी बुद्रुक येथील कविता दामू बर्डे हिच्याशी शेवगाव तालुक्यातील आंतरवाली येथे विवाह लावण्यात आला. मात्र, लग्नानंतर दोनच दिवसांनी संबंधित महिला कोणालाही न सांगता निघून गेल्याचे तक्रारदाराचे म्हणणे आहे. त्यानंतर संपर्क साधण्याचा प्रयत्न करूनही समाधानकारक प्रतिसाद मिळाला नसल्याने आपली फसवणूक झाल्याची खात्री झाल्याचे त्यांनी तक्रारीत



नमूद केले आहे. या प्रकरणात खोटा विवाह जुळवून आर्थिक फसवणूक करण्यात आल्याचा आरोप करत संबंधितांविरोधात सखोल चौकशी करून कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी ज्ञानेश्वर कडूळे यांनी शेवगाव पोलिसांकडे केली आहे.

दरम्यान, पोलिसांनी तक्रार स्वीकारली असून प्रकरणाची चौकशी सुरू आहे. तक्रारीतील आरोपांची सत्यता तपासल्यानंतर पुढील कायदेशीर कार्यवाही केली जाणार असल्याचे समजते.

# सौ. के. एस. के. (काकू) कृषि महाविद्यालयाच्या ‘उझी माशी ट्रॅप’ला भारत सरकारची पेटंट डिझाइन नोंदणी मंजुर

बीड ।प्रतिनिधी

रेशीम उद्योगाला मोठे आर्थिक नुकसान करणाऱ्या उझी माशी या घातक परजीवी माशीच्या प्रभावी नियंत्रणासाठी विकसित करण्यात आलेल्या ‘उझी माशी ट्रॅप’ या अभिनव नेट सापळ्याला भारत सरकारच्या पेटंट कार्यालयाकडून डिझाइन नोंदणी प्राप्त झाली आहे. पर्यावरणपूरक, किफायतशीर व प्रभावी असलेले हे तंत्रज्ञान रेशीम उद्योगासाठी महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

बीड जिल्ह्यात उभारण्यात येत असलेल्या सिल्क पार्क प्रकल्पाच्या पार्श्वभूमीवर रेशीम उद्योगाशी संबंधित संशोधनाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. अशा वेळी विकसित करण्यात आलेला उझी माशी ट्रॅप हा रेशीम उत्पादक शेतकऱ्यांसाठी उपयुक्त ठरणारा नाविन्यपूर्ण शोध मानला जात आहे.

हा नेट सापळा सौ. के. एस. के. (काकू) कृषि महाविद्यालयातील प्राध्यापक, इंजी. दीपक दत्तात्रय शिंदे, प्रा. अमोल पांडुरंग ढोरमारे, डॉ. गणेश महादेव बोडखे, डॉ. सुधीर गोविंद माने आणि प्रा. लक्ष्मण मधुकर बोंद्रे यांच्या संयुक्त प्रयत्नातून विकसित करण्यात आला आहे.

उझी माशी ही रेशीम किड्यावर परजीवी म्हणून वाढून कोषांचे उत्पादन व गुणवत्ता कमी करते. या समस्येवर उपाय म्हणून विकसित करण्यात आलेला हा ट्रॅप उझी माशीचे प्रभावी नियंत्रण करून रेशीम उत्पादन व कोषांची गुणवत्ता वाढविण्यास मदत करणार आहे.या यशाबद्दल श्री. अनंत कृषि विकास प्रतिष्ठानचे सचिव तथा माजी मंत्री जयदत्त (अण्णा) क्षीरसागर तसेच सहसचिव डॉ. गोविंद साळुंखे यांनी संशोधकांचे अभिनंदन केले. संशोधकांची ही कामगिरी महाविद्यालय, बीड जिल्हा आणि रेशीम उद्योगासाठी अभिमानास्पद ठरत असून शेतकरी हितासाठी महत्त्वपूर्ण योगदान देणारी उपलब्धी मानली जात आहे.

# पावसाच्या पार्श्वभूमीवर शासकीय यंत्रणा 'अलर्ट मोड'वर ठेवा -मुख्यमंत्री

मुंबई ।प्रतिनिधी

मुंबईसह किनारी भागातील जिल्ह्यात वाऱ्याचा ताशी वेग ५० ते ७० किलोमीटर प्रति तास असण्याची शक्यता आहे. यासोबतच आज दुपारी ३ ते ४.३० वाजे दरम्यान समुद्राला भरती येण्याची शक्यताही आहे. या पार्श्वभूमीवर सर्व संबंधित यंत्रणांनी २४ बाय ७ अलर्ट मोडवर राहून आपत्कालीन परिस्थिती आल्यास तातडीने मदत कार्य करावे, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहे. राज्यभरात मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता असल्याने आज आणि उद्या अत्यावश्यक काम असल्याशिवाय नागरिकांनी घराबाहेर पडू नये , असे आवाहनही मुख्यमंत्र्यांनी केले.

यावेळी राज्य आपत्ती नियंत्रण कक्षामध्ये आयोजित बैठकीत राज्यातील पावसामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीचा आढावा मुख्यमंत्री फडणवीस यांनी घेतला. याप्रसंगी आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन उपस्थित होते.

---

**दिवाणी न्यायालय, घनसावंगी येथील**
**श्री सी. एस. जगताप, दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, घनसावंगी यांचे न्यायालयात.**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्र. ७३/२०२६**
**तुळसाबाई – वि.– निरंक**
**अर्जदार – तुळसाबाई उत्तम ढेरे, वय ७० वर्ष, धंदा घरकाम रा.बोडखा बु.ता.घनसावंगी जि. जालना**
**विरुध्द –निरंक**

## जाहीर प्रगटन

अर्ज – कलम ३ व ७ बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळणेबाबत.

अर्जदार यांनी ॲड.ए.के.मते यांच्या मार्फत या न्यायालयात असा अर्ज केला की, अर्जदार यांचे पती नामे उत्तम श्रीमंत ढेरे यांचा मृत्यू दिनांक २३/०४/२०२६ रोजी मौजे बोडखा बु. ता.घनसावंगी जि.जालना येथे झाला आहे.

हे की,उत्तम श्रीमंत ढेरे यांना अर्जदारांशिवाय ईतर अन्य कुठलेही कायदेशीर वारस नाहीत. अर्जदारास शासकीय व निमशासकीय कामकाजासाठी मयताचे वारस म्हणून वारस प्रमाणपत्राची नितांत आवश्यकता आहे.

करीता या जाहीर प्रगटनाद्वारे सर्वत्र कळविण्यात येते की, या बाबत जर कोणास काहीएक आक्षेप असेल तर त्यांनी सदरचे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात आपला आक्षेप सादर करावा. जर नमूद केलेल्या काळात कोणाचाही आक्षेप आला नाही, तर संबंधित प्रकरणात कायद्याप्रमाणे योग्य ती कार्यवाही केली जाईल, याची नोंद घ्यावी. सदर प्रकरणात पुढील तारीख ०५/०८/२०२६ ठेवण्यात आली आहे.

आज दिनांक ०१/०७/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले आहे.

क.लिपीक
**(एस.एस.देशमुख)**

शिक्का

आदेशान्वये,
**(एस.व्ही. चाटुफळे)**
सहायक अधिक्षक दिवाणी न्यायालय क. स्तर, घनसावंगी.

---

**श्री.एस.एस.बडगुजर सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, केज, यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज २४६/२०२६**
**श्रीराम व इतर विरुध्द निरंक**

ज्यापेक्षा अंबऋषि पि. एकनाथ डिसले रा. बोरगाव (बु) ता. केज जि. बीड हे दिनांक १७/१२/२००४ रोजी, किंवा त्या सुमारास रा. बोरगाव (बु) ता. केज जि. बीड येथे मयत झालेले असून अर्जदार रा. बोरगाव (बु) ता. केज जि. बीड यांनी हया कोर्टात सदरहू मयत अंबऋषि पि. एकनाथ डिसले रा. बोरगाव (बु) ता. केज जि.बीड

अर्जदार :-

१. श्रीराम पि. अंबऋषि डिसले, वय-७९वर्षे, धंदा-शेती रा. बोरगाव (बु) ता. केज जि. बीड

२. जिजाबाई भ्र. अंबऋषि डिसले, वय-८३वर्षे, धंदा-शेती रा. बोरगाव (बु) ता. केज जि.बीड

यांनी शासकीय/निमशासकीय कामासाठी वारसाचे सर्टिफिकेट मिळावे असा अर्ज विधिज्ञ यु बी निंगुळे यांच्यामार्फत केला आहे. त्यापेक्षा अर्जदाराशिवाय सदर सदरहु अर्जदार मयताचे वारस नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर हया जाहिरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने हया कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्या आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार हयाचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क साबित दिसल्यास त्याला सदरहू मयत अंबऋषि पि. एकनाथ डिसले रा. बोरगाव (बु) ता. केज जि. बीड चे वारसाचे सर्टिफिकेट देईल.

आज दि. ०२/०७/२०२६ रोजी आमच्या सहीने व न्यायालयाच्या शिक्कयानिशी दिले.

सदर प्रकरणाची पुढील दि. १४/०८/२०२६

स्वाक्षरित/-
ए.एल.मुंडे
क.लिपीक
स.दि.न्या.क.स्तर, केज

शिक्का

आदेशावरुन
स्वाक्षरित/-
सहा. अधिक्षक, दिवाणी न्यायालय, क. स्तर, केज

---

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**गेवराई, जि. बीड येथील सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर श्रीमती. एस एच पाटील यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांकः ३७५/२०२६**
**गणेश बाहेती निरंक**
**(मार्फत ॲड. एल.जी. कुलकर्णी )**

ज्याअर्थी मयत नामे वसंताबाई भ्र. शिवनारायण झंवर हे दि. ०८.०२.२०२६ हे रोजी मौजे सिरसमार्ग, ता. गेवराई जि. बीड येथे मयत झाले आहेत.

अर्जदार

१. गणेश पि. बालाप्रसाद बाहेती वय २९ वर्षे धंदा – नोकरी रा. गेवराई ता. गेवराई जि. बीड

शासकीय/निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत नामे बसंताबाई भ्र. शिवनारायण झंवर हे दि. ०८.०२.२०२६ रोजी येथे मयत झाले असून ते मौजे रा. कुंभारवाडी ता. गेवराई जि. बीड येथील रहिवासी असून यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

पुढील तारीख : १८.०८.२०२६

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
सह दिवाणी न्यायालय क. स्तर, गेवराई

शिक्का

आदेशावरुन
स्वाक्षरित/-
**सहायक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय क. स्तर. गेवराई

---

### टी.सी हरवला आहे

नाव -: श्रावणी वैभव स्वामी या नावाचा १२ पासचा टी.सी. आणि मूळ कागदपत्रांची बॅग ही पिंपरगव्हाण रोड ते बीड बस स्टॅन्ड प्रवासा दरम्यान हरवली आहे.

तरी कोणाला सापडल्यास खालील क्रमांकावर संपर्क साधावा.

मो.नं. ९४ २२ ७४ ३७ ९२

### टी.सी हरवला आहे

नाव -: सार्थक वैभव स्वामी या नावाचा १२ पासचा टी.सी. आणि मूळ कागदपत्रांची बॅग ही पिंपरगव्हाण रोड ते बीड बस स्टॅन्ड प्रवासा दरम्यान हरवली आहे.

तरी कोणाला सापडल्यास खालील क्रमांकावर संपर्क साधावा.

मो.नं. ९९ ६० ४६ ३२ ४४

### टी.सी हरवला आहे

नाव -: कुणाल पिंटू राठोड या नावाचा १० पास चा टी.सी. भेंडटाकळी ते गेवराई प्रवासा दरम्यान हरवला आहे .

तरी कोणाला सापडल्यास खालील क्रमांकावर संपर्क साधावा.

मो.नं. ९३५९३८८८६०

---

## जाहीर प्रगटन

**तहसीलदार,बीड यांचे न्यायालयात**
**जन्म नोंद दावा प्रकरण अर्ज नं.३५१/२०२६**
**शेख समीर शेख सलीम** विरूध्द **गामपंचायत कार्यालय पाली ता.जि.बीड**

पहा.

**१. शेख समीर शेख सलीम, रा.पाली, ता.जि.बीड**

उपरोक्त प्रमाणे जन्म मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञा मार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असुन जन्म धारक **शेख समीर शेख सलीम**यांचा **दिनांक ३०.११.१९९६** रोजी जन्म झालेला असुन त्यांचे जन्म नोंद जन्म मृतयू नोंदवहीमध्ये घेणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरू आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार यास जनमाची नोंद ग्रामपंचायत कार्यालय/न.प.कार्यालयास **पाली** ता.बीड येथील जन्म मृत्यू रजिस्टरला घेवून जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर ह्या जाहीरनाम्याच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर राहुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवून त्यांचा हक्क शाबील दिसल्यास त्यांना सदरहु जन्म नोंद ग्रामपंचायत कार्यालय मौजे बेलखंडी पा. ता.जि.बीड येथील जन्म मृत्यू रजिस्टरला घेवून जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दि.२५.०२.२०२६ रोजी माझ्या सही व शिक्क्यानिशी दिले.

सदर प्रकरणात पुढील तारिख २५.०३.२०२६ ही आहे.

**स्वाक्षरित/–**
**तहसीलदार,बीड**

---

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**श्री. रविंद्र अ. मिसाळ दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, गेवराई जि. बीड यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ४२५/२०२६**
**रोहीणी भ्र. सुदर्शन आहेर व इतर वि. निरंक**
**(मार्फत – ॲड. एस.एस. काळे, गेवराई)**

ज्याअर्थी मयत नामे सुदर्शन महादेव आहेर, रा. बोरीपिंपळगाव ता. गेवराई जि. बीड हे/हया दिनांक २५/११/२०२५ रोजी बोरीपिंपळगाव ता. गेवराई जि.बीड येथे मयत झाले / झाल्या आहेत, अर्जदार क्र. १ रोहीणी भ्र. सुदर्शन आहेर, वय ३१ वर्षे, धंदा शेती, रा. बोरीपिंपळगाव ता. गेवराई जि.बीड, अर्जदार क्र. २ गौरवी पि. सुदर्शन आहेर, वय ११ वर्षे, अपाक आई अर्जदार क्र. १, अर्जदार क्र. ३ श्रीतेज पि. सुदर्शन आहेर, वय ९ वर्षे, अज्ञान अपाक आई अर्जदार क्र. १, अर्जदार क्र. ४ नंदाबाई भ्र. महादेव आहेर, वय ५७ वर्षे, धंदा शेती, रा. सदर, यांनी शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करिता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हते असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासून तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदाराच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत सुदर्शन महादेव आहेर यांचे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक २३/०६/२०२६ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्कानिशी दिले.

पुढील तारीख – ०४/०८/२०२६

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/-
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

---

**जाहीरनामा**
**वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत**
**श्रीमती एम.एस. कुलकर्णी दिवाणी न्यायाधिश क. स्तर, केज, यांच्या न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज कमांक २४५/२०२६**
**नि.क्र.७/ड**
**अच्युतराव विरुध्द निरंक**

ज्यापेक्षा मयत कडुबाई बाबुराव ठोंबरे रा. सोनीजवळा ता. केज. जि. बीड हे दिनांक ०६ माहे १० सन २०२३ रोजी मौजे स्वामी रामानंद तिर्थ ग्रामीण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालय अंबाजोगाई ता. अंबाजोगाई जि. बीड येथे मयत झाले आहेत. अर्जदार यांनी हया कोर्टास सदरहु कडुबाई बाबुराव ठोंबरे रा. सोनीजवळा ता. केज. जि. बीड यांचे मृत्यू नंतर त्यांना शासकीय व निमशासकीय कार्यालयीन कामकाजाचा लाभ मिळणेसाठी वारस प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज विधिज्ञ मस्के एस. बी. यांचे मार्फत दाखल केला आहे.

अर्जदार :

०१. अच्युतराव पि. बाबुराव ठोंबरे वय- ५४ वर्षे, धंदा-मजुरी रा. सोनीजवळा ता. केज जि. बीड ह.मु. केज ता. केज जि. बीड

त्यापेक्षा अर्जदाराशिवाय सदरहु अर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्यांनी हया कोर्टात हजर होउन आपल्या हरकती कळवाव्या, आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार हयाचे हक्काबददल लागलीच पुरावा घेउन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु कडुबाई बाबुराव ठोंबरे रा. सोनीजवळा ता. केज. जि. बीड यांचे वारस प्रमाणपत्र देण्यात देईल.

आज २०२६ सालातील सातवा महिना आहे.

पु.ता. २०/०८/२०२६

स्वाक्षरित
**व. लपिक**

शिक्का

आदेशावरुन
स्वाक्षरित
सहा.अधीक्षक
दिवाणी न्यायालय, क. स्तर, केज

---

**दिवाणी न्यायालय, घनसावंगी येथील**
**श्री सी. एस. जगताप, दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, घनसावंगी यांचे न्यायालयात.**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्र. ७५/२०२६**
**ओमप्रकाश – वि.– निरंक**

अर्जदार:

१. ओमप्रकाश पि.तुळशीराम जाधव, वय ६० वर्ष, धंदा शेती

२. रामप्रसाद पि.ओमप्रकाश जाधव, वय ४५ वर्ष, धंदा शेती

३. बाळासाहेब पि.ओमप्रकाश जाधव वय ४२ वर्ष, धंदा शेती वरील सर्व रा. शिंदेवडगांव ता. घनसावंगी जि. जालना

४. संजवणी भ्र.सखाराम धानुरे, वय ४० वर्षे, धंदा घरकाम रा.बोंधलापुरी ता.घनसावंगी जि.जालना

विरुध्द –निरंक

जाहीर प्रगटन

अर्ज – कलम ३ व ७ बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळणेबाबत.

अर्जदार यांनी ॲड.ए.के. मते यांच्या मार्फत या न्यायालयात असा अर्ज केला की, अर्जदार क्र. १ यांची पत्नी व अर्जदार क्र.२ ते ४ यांची आई नामे अनुराधा ओमप्रकाश जाधव यांचा मृत्यू दिनांक २४/०६/२०२४ रोजी मौजे शिंदेवडगांव ता. घनसावंगी जि. जालना येथे झाला आहे.

हे की, अनुराधा ओमप्रकाश जाधव यांना अर्जदारांशिवाय ईतर अन्य कुठलेही कायदेशीर वारस नाहीत. अर्जदारास शासकीय व निमशासकीय कामकाजासाठी मयताचे वारस म्हणून वारस प्रमाणपत्राची नितांत आवश्यकता आहे.

करीता या जाहीर प्रगटनाद्वारे सर्वत्र कळविण्यात येते की, या बाबत जर कोणास काहीएक आक्षेप असेल तर त्यांनी सदरचे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात आपला आक्षेप सादर करावा. जर नमूद केलेल्या काळात कोणाचाही आक्षेप आला नाही, तर संबंधित प्रकरणात कायद्याप्रमाणे योग्य ती कार्यवाही केली जाईल, याची नोंद घ्यावी. सदर प्रकरणात पुढील तारीख ०५/०८/२०२६ ठेवण्यात आली आहे.

आज दिनांक ०१/०७/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले आहे.

क.लिपीक
**(एस.एस.देशमुख)**

शिक्का

आदेशान्वये,
**(एस.व्ही. चाटुफळे)**
सहायक अधिक्षक दिवाणी न्यायालय क. स्तर, घनसावंगी.

---

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२६/सेतु/कावि-८०३ दि.०६.०७.२०२६**

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **पांडुरंग भावसिंग राठोड, रा.पिंपरखेड ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **स्वत**:च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | पांडुरंग भावसिंग राठोड | स्वतः | ०७.०७.१९८० |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- ०६/०७/२०२६ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/–**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

---

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२६/सेतु/कावि-२२१ दि.२५.०६.२०२६**

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **शेख जेबा अशपाक, रा.शहागड ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **स्वत**:च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | शेख जेबा अशपाक | स्वतः | १०.०८.१९८६ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/- रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/–**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

---

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२६/सेतु/कावि-२२५ दि.०२.०६.२०२६**

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **मोसीन मुस्ताक शेख, रा.शहागड ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **स्वत**:च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | मोसीन मुस्ताक शेख | स्वतः | १२.१२.१९८८ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/- रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/–**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

---

## जाहीर प्रगटन

**तहसीलदार,बीड यांचे न्यायालयात**
**जन्म नोंद दावा प्रकरण अर्ज नं.१००९/२०२६**
**शेख फरजाना बेगम शेख चुन्नू** विरूध्द **गामपंचायत कार्यालय नेकनुर ता.जि.बीड**

पहा.

**१. शेख फरजाना बेगम शेख चुन्नू, रा.नेकनुर, ता.जि.बीड**

उपरोक्त प्रमाणे जन्म मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञा मार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असुन जन्म धारक **शेख फरजाना बेगम शेख चुन्नू** यांचा **दिनांक २४.०६.१९९४** रोजी जन्म झालेला असुन त्यांचे जन्म नोंद जन्म मृतयू नोंदवहीमध्ये घेणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरू आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार यास जनमाची नोंद ग्रामपंचायत कार्यालय/न.प.कार्यालयास **नेकनुर** ता.बीड येथील जन्म मृत्यू रजिस्टरला घेवून जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर ह्या जाहीरनाम्याच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर राहुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवून त्यांचा हक्क शाबील दिसल्यास त्यांना सदरहु जन्म नोंद ग्रामपंचायत कार्यालय मौजे बेलखंडी पा. ता.जि.बीड येथील जन्म मृत्यू रजिस्टरला घेवून जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दि.१८.०५.२०२६ रोजी माझ्या सही व शिक्क्यानिशी दिले.

सदर प्रकरणात पुढील तारिख १८.०६.२०२६ ही आहे.

**स्वाक्षरित/–**
**तहसीलदार,बीड**

---

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**श्री. रविंद्र अ. मिसाळ दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, गेवराई जि. बीड यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ४४६/२०२६**
**आण्णासाहेब पि. आप्पासाहेब शेळके व इतर वि. निरंक**
**(मार्फत – ॲड. एस.पी. येवले, गेवराई)**

ज्याअर्थी मयत नामे कमलबाई आप्पासाहेब शेळके, रा. सैदापुर ता. गेवराई जि. बीड हे/हया दिनांक २०/०८/२०२१ रोजी सैदापुर ता. गेवराई जि.बीड येथे मयत झाले / झाल्या आहेत, अर्जदार क्र. १ आण्णासाहेब पि. आप्पासाहेब शेळके, वय ४९ वर्षे, धंदा शेती, रा. पुना मार्बल जवळ बंकर निवास सर्व्हे नं. २८/१ व्ही.टी.सी. पिंपळे गुरव पो. औध्दा कॅम्प पुणे ता. जि. पुणे, अर्जदार क्र. २ बाळासाहेब आप्पासाहेब शेळके, वय ४७ वर्षे, धंदा शेती, रा. सैदापुर ता. गेवराई जि.बीड, अर्जदार क्र. ३ शुभदा भ्र. बंडेराव केसभट, वय ४६ वर्षे, धंदा घरकाम, रा. गायकवाड जळगाव ता. शेवगाव जि. अहिल्यानगर, अर्जदार क्र. ४ आप्पासाहेब पि. जनार्दन शेळके, वय ७८ वर्षे, धंदा शेती, रा. सैदापुर ता. गेवराई जि. बीड, यांनी शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करिता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हते असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासून तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदाराच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत कमलबाई आप्पासाहेब शेळके यांचे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक ०१/०७/२०२६ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्कानिशी दिले.

पुढील तारीख – १२/०८/२०२६

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
सह दिवाणी न्यायालय क. स्तर, गेवराई

शिक्का

आदेशावरुन
स्वाक्षरित/-
**सहायक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय क. स्तर. गेवराई

---

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२६/सेतु/कावि-६० दि.०२.०७.२०२६**

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **शबानाबी बाबूखा पठाण, रा.ताड हादगांव ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **स्वत**:च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | शबानाबी बाबूखा पठाण | स्वतः | २४.०८.१९७७ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/- रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/–**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

---

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२६/सेतु/कावि-४९१ दि.१४.०९.२०२६**

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **मुजीब सुभानखाँ पठाण, रा.दुनगांव ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **स्वत**:च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | मुजीब सुभानखाँ पठाण | स्वतः | ०१.०१.१९७९ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- १४/०५/२०२६ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/–**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

---

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२६/सेतु/कावि-३७७ दि.-.-.२०२६**

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **शामल श्रीकृष्णा सकळकर रा.खडकेश्वर ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **स्वत**:च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | शामल श्रीकृष्णा सकळकर | मुलगी | १६.०३.२०२५ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/- रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/–**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

# ना.समीर काझी यांच्या नेतृत्वाखाली वक्फ महामंडळाच्या कामकाजाला अभूतपूर्व गती!

## राज्य शासनाच्या भक्कम पाठबळामुळे महाराष्ट्र वक्फ महामंडळ जीपीएस मॅपिंगमध्ये भारतात पहिले!

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्र वक्फ महामंडळाने गेल्या काही महिन्यांत प्रशासनिक कामकाजात गती आणत विविध महत्त्वाच्या उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी केल्याची दिसून येत आहे. अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या दर्गे, मशिदी आणि कब्रस्तानांच्या नोंदणी प्रक्रियेला वेग देण्याबरोबरच आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून जीपीएस मॅपिंगची यशस्वी अंमलबजावणी करण्यात आल्याने वक्फ मालमत्तांच्या व्यवस्थापनात पारदर्शकता आणि सुसूत्रता वाढण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, काही वर्षांपूर्वी महाराष्ट्र वक्फ मंडळाकडे सुमारे १५ हजार मस्जिद,दर्गा आणि कब्रस्तान च्या नोंद होती. त्यामध्ये मोठ्या प्रमाणावर वाढ होऊन आता ३८ हजारांहून अधिक मशिदी, दर्गे, कब्रस्ताने आणि अन्य वक्फ मालमत्तांची नोंदणी पूर्ण करण्यात आल्याचे सांगितले जात आहे. ही वाढ कोणताही चमत्कार नसून, सातत्यपूर्ण नियोजन, प्रशासकीय समन्वय आणि अधिकाऱ्यांच्या मेहनतीचे फलित असल्याचे बोलले जात आहे.

याशिवाय, महाराष्ट्र हे वक्फ मालमत्तांचे जीपीएस मॅपिंग व्यापक स्वरूपात पूर्ण करणारे देशातील अग्रगण्य राज्य ठरत असल्याचेही सांगितले जात आहे. या उपक्रमामुळे नागरिकांना घरबसल्या संबंधित वक्फ मालमत्तेचे स्थान, तिचा वापर आणि स्वरूप ऑनलाइन पद्धतीने पाहणे शक्य होणार आहे. शैक्षणिक संस्था, रुग्णालये, धार्मिक स्थळे, व्यावसायिक वापरासाठी असलेल्या जागा तसेच इतर प्रकारच्या मालमत्तांचे स्वतंत्र वर्गीकरण करून त्यांची डिजिटल नोंद करण्यात आली आहे. त्यामुळे भविष्यात वक्फ मालमत्तांचे नियोजन, संरक्षण आणि व्यवस्थापन अधिक प्रभावी होण्यास मदत होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.





या व्यापक प्रकल्पासाठी महाराष्ट्र शासनाने वक्फ महामंडळाला आर्थिक बळ दिल्याचेही समोर आले आहे. शासनाने यापूर्वी सुमारे २२ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिल्यामुळे नोंदणी, डिजिटायझेशन, जीपीएस मॅपिंग आणि कार्यालयीन आधुनिकीकरणाची कामे गतीने पूर्ण करणे शक्य झाल्याचे सांगितले जात आहे.

> हे कोणतेही जादू नाही; ही संपूर्ण टीमची मेहनत, नियोजन आणि शासनाच्या सहकार्याचे फलित आहे. अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या वक्फ मालमत्तांच्या नोंदणीला गती देत जीपीएस मॅपिंगसारखे आधुनिक उपक्रम राबविण्यावर आम्ही भर दिला आहे. भविष्यातही पारदर्शक, कायदेशीर आणि तंत्रज्ञानाधारित व्यवस्थापनाच्या माध्यमातून महाराष्ट्र वक्फ महामंडळ अधिक सक्षम करण्यासाठी आमचे प्रयत्न सुरू राहतील, असे महाराष्ट्र वक्फ महामंडळाचे अध्यक्ष समीर काजी यांनी सांगितले.

याचबरोबर, चालू आर्थिक वर्षाच्या अर्थसंकल्पामध्येही महाराष्ट्र शासनाने वक्फ महामंडळाच्या बळकटीकरणासाठी १५ कोटी रुपयांची तरतूद केल्याची माहिती आहे. या निधीमुळे संस्थेची प्रशासकीय क्षमता वाढविणे, कार्यालयीन सुविधा विकसित करणे, संगणकीकरण, आवश्यक यंत्रसामग्री तसेच अन्य पायाभूत सुविधा उभारण्यास मदत होणार असल्याचे मानले जात आहे.

वक्फ महामंडळाच्या दैनंदिन कामकाजासाठी आवश्यक असलेले कार्यालयीन खर्च, संगणक प्रणाली, कार्यालयीन साहित्य तसेच इतर प्रशासकीय सुविधा सक्षम करण्यासाठी शासनाच्या सहकार्यामुळे संस्थेच्या कार्यक्षमतेत वाढ झाल्याचेही संबंधितांकडून सांगितले जात आहे.

दरम्यान, वक्फ महामंडळाचे अध्यक्ष समीर काजी यांनी पदभार स्वीकारल्यानंतर संस्थेच्या कामकाजात सकारात्मक बदल दिसून येत असल्याची चर्चा विविध स्तरांवर होत आहे.

---

## बीड मतदारसंघातील नागरिकांनी एसआयआर नोंदणी प्रक्रिया पूर्ण करावी–डॉ.योगेश क्षीरसागर

बीड ।प्रतिनिधी

भारतीय निवडणूक आयोगाच्या वतीने राज्यात एसआयआर अर्थात मतदार यादी विशेष सखोल पुनरिक्षण मोहीम राबविण्यात येत असून, मतदार याद्या अधिक अचूक, अद्ययावत व त्रुटीरहित करण्यासाठी बूथ लेव्हल अधिकारी (बीएलओ) घरोघरी जाऊन तसेच बूथवर थांबून मतदारांच्या माहितीची पडताळणी करत आहेत. या पार्श्वभूमीवर बीड विधानसभा मतदारसंघातील सर्व नागरिकांनी बीएलओंना आवश्यक सहकार्य करून एसआयआरचा नमुना अर्ज भरून द्यावा, असे आवाहन भाजपचे युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांनी केले आहे.

पत्रकात पुढे म्हटले आहे की, निवडणूक आयोगाच्या या मोहिमेचा उद्देश कोणताही पात्र मतदार वंचित राहू नये आणि अपात्र नावे मतदार यादीत राहू नयेत, हा आहे. डॉ.योगेश क्षीरसागर म्हणाले की, बीएलओ आपल्या प्रभागात दररोज भेट देत असून नागरिकांनी त्यांना योग्य माहिती व आवश्यक कागदपत्रांची माहिती उपलब्ध करून द्यावी. एसआयआरचा फॉर्म वेळेत भरून दिल्यास मतदार यादीतील नाव अचूक राहण्यास मदत होईल. मतदार यादीतील नाव कायम राहणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी असून भविष्यात मतदानाच्या हक्कासह विविध शासकीय प्रक्रियांसाठीही त्याचा लाभ होतो. ते पुढे म्हणाले की, अनेक नागरिक मतदान ओळखपत्राचा उपयोग केवळ मतदानापुरताच असल्याचा समज करून घेतात. प्रत्यक्षात विविध शासकीय कामकाज, ओळख पडताळणी तसेच इतर अनेक प्रक्रियांमध्ये मतदार ओळखपत्र उपयुक्त ठरते. त्यामुळे मतदार यादीतील नाव वगळले जाणार नाही, याची प्रत्येकाने दक्षता घ्यावी. बीएलओ आपल्या घरी आल्यानंतर त्यांना आवश्यक माहिती देऊन एसआयआर प्रक्रिया पूर्ण करावी,



जेणेकरून भविष्यात कोणतीही गैरसोय किंवा शासकीय कामात अडथळा निर्माण होणार नाही, असे आवाहनही डॉ.योगेश क्षीरसागर यांनी केले.

## अपघातग्रस्त तरुणाला आमदार सुरेश धस यांच्या प्रयत्नांतून दिलासा

मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीतून उपचारासाठी ५० हजार रुपये मंजूर

पाटोदा : प्रतिनिधी

पिंपळवंडी परिसरातील अपघातग्रस्त तरुण अभिमन्यू आनंदा जरे याच्या उपचारासाठी आमदार सुरेश धस यांच्या पाठपुराव्यामुळे मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीतून ५० हजार रुपयांची आर्थिक मदत मंजूर झाली आहे. अवघ्या दोन दिवसांत ही मदत मंजूर झाल्याने जरे कुटुंबाला मोठा दिलासा मिळाला आहे.अभिमन्यू आनंदा जरे हा पिंपळवंडी येथील रस्त्यावर दुचाकीवरून जात असताना एका प्रवासी बसची धडक बसल्याने गंभीर जखमी झाला होता. अपघातानंतर त्याला तातडीने अहिल्यानगर येथील श्रीदीप हॉस्पिटल येथे उपचारासाठी दाखल करण्यात आले.

या घटनेची माहिती जरेवाडी शाळेचे मुख्याध्यापक संदीप पवार यांनी आमदार सुरेश धस यांना दिल्यानंतर त्यांनी तातडीने पाटोदा येथील रुग्ण मदत कार्याचे समन्वयक तथा सहाय्यक ड. महेश बेदरे यांना आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करून मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीसाठी प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना दिल्या.त्यानुसार सर्व आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करून प्रस्ताव तातडीने सादर करण्यात आला. त्यानंतर मुंबई येथे आमदार सुरेश धस यांचे सहाय्यक विनोद वाघ यांनी मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी कक्षात सातत्याने पाठपुरावा केला. या संयुक्त प्रयत्नांना यश येत अवघ्या दोन दिवसांत मंगळवारी श्रीदीप हॉस्पिटलच्या खात्यावर उपचारासाठी ५० हजार रुपयांची मदत मंजूर झाल्याचे अधिकृत पत्र प्राप्त झाले.आमदार सुरेश धस यांच्या मार्गदर्शनाखाली पाटोदा येथून संपूर्ण प्रक्रिया ड. महेश बेदरे यांनी पूर्ण केली तसेच पीए सोमीनाथ कोल्हे यांनी देखील सहकार्य केले या मदतीमुळे उपचाराचा आर्थिक भार कमी होऊन जरे कुटुंबाला मोठा आधार




मिळाला आहे. याबद्दल जरे कुटुंबीयांनी आमदार सुरेश धस तसेच मदत प्रक्रियेत सहभागी संपूर्ण यंत्रणेचे आभार व्यक्त केले.

## नाशिक धर्मांतर प्रकरणात नीदा खानला सशर्त जामीन



नाशिक । प्रतिनिधी

नाशिकमधील बहुराष्ट्रीय आयटी कंपनीतील कथित धर्मांतर आणि छळप्रकरणात संशयित आरोपी नीदा एजाज खान हिला नाशिक रोड अतिरिक्त सत्र न्यायालयाने सोमवारी सशर्त जामीन मंजूर केला. याच प्रकरणातील संशयित तौसिफ बिलाल अत्तार यालाही न्यायालयाने जामीन दिला असून, मुख्य आरोपी दानिश शेख याचा जामीन अर्ज मात्र न्यायालयाने फेटाळून लावला आहे.

देवळाली कॅम्प पोलिस ठाण्यात दाखल असलेल्या या गुन्ह्यात अटक झाल्यानंतर नीदा खानने आपण गर्भवती असल्याचे कारण देत अनेक वेळा जामिनासाठी अर्ज केला होता. मात्र, यापूर्वी न्यायालयाने तिचे सर्व अर्ज फेटाळून न्यायालयीन कोठडी सुनावली होती. गर्भवती असल्यामुळे तिला कारागृहात आवश्यक त्या विशेष सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या.

दरम्यान, सोमवारी नाशिक रोड अतिरिक्त सत्र न्यायालयाने तिचा अर्ज मंजूर करत सशर्त जामीन मंजूर केला. या प्रकरणातील आणखी एक आरोपी तौसिफ बिलाल अत्तार यालाही जामीन मिळाला आहे. मात्र, तौसिफविरुद्ध अन्य पाच गुन्हेही दाखल असल्याची माहिती समोर आली आहे.या प्रकरणातील मुख्य आरोपी दानिश शेखचा जामीन अर्ज न्यायालयाने नामंजूर केल्याने त्याला अद्याप दिलासा मिळालेला नाही.

## आमदार विजयसिंह पंडित आणि नगराध्यक्षा प्रेमलताताई पारवे यांच्या मार्गदर्शनाखाली रस्त्याचे काम मार्गी









बीड । प्रतिनिधी

शहरातील प्रभाग क्रमांक १६,१७,व १८ मधील राजुरीवेस ते माळीवेस पोलीस चौकी, नर्सरी रोड ते कौसर चौक तसेच लेंडी रोड ते राष्ट्रवादी भवन पर्यंत या परिसरातील सिमेंट रस्ता व नाळी बांधकामाच्या कामास अधिकृतपणे सुरुवात झाली आहे. काही दिवसांपूर्वी आमदार विजयसिंह पंडित आणि नगराध्यक्ष प्रेमलाताताई पर्वे यांच्या हस्ते या विकासकामाचे भूमिपूजन करण्यात आले होते.

शहरातील विविध विकासकामांसाठी आमदार विजयसिंह पंडित यांच्या प्रयत्नांतून सुमारे २२ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला असून, त्याअंतर्गत प्रभाग क्रमांक १६,१७ ,व १८ मधील हे महत्त्वाचे काम हाती घेण्यात आले आहे. या परिसरातील रस्त्याची अत्यंत दुरवस्था झाल्याने नागरिकांना अनेक वर्षांपासून मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. तसेच या भागात सरकारी, दवाखाना, शाळा कॉलेज, ग्रामीण पोलीस ठाणे असल्याने वाहतुकीची व नागरिकांची मोठी वर्दळ असते.

स्थानिक नागरिकांनी अनेक वर्षांपासून रस्ता व नाळीच्या कामाची मागणी केली होती. मात्र तब्बल २५ ते ३० वर्षांनंतर प्रथमच या कामाला प्रत्यक्ष सुरुवात झाल्याने परिसरातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

काम सुरू झाल्यानंतर आमदार विजयसिंह पंडित, नगराध्यक्ष प्रतिनिधी मुजीब शेख, उपाध्यक्ष विनोद मुळूक, स्वच्छता सभापती शेख निजाम, स्थानिक नगरसेवक व गटनेते फारुख पटेल, नगरसेवक जयत्तुला खान, माजी उपाध्यक्ष सादेक जमा, नगरसेवक अशफाक इनामदार, माजी नगरसेवक शेख इकबाल बॉस, शेख खलील (बाबू), शेख बिलाल आणि महेश धांडे यांनी कामाच्या ठिकाणी भेट देऊन पाहणी केली. यावेळी संबंधित ठेकेदाराला दर्जेदार व गुणवत्तापूर्ण काम करण्याच्या सूचना देण्यात आल्या. तसेच नागरिकांशी संवाद साधून त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या.

कामाच्या गुणवत्तेबाबत नागरिकांनी समाधान व्यक्त करत विकासकाम सुरू झाल्याबद्दल लोकप्रतिनिधींचे आभार मानले. या रस्ता व नाळी प्रकल्पामुळे परिसरातील वाहतूक सुलभ होण्यासह पावसाळ्यात होणाऱ्या पाणी साचण्याच्या समस्येवरही मोठ्या प्रमाणात उपाय होणार असल्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## एसआयआर च्या नव्या मसुद्यात चार राज्यांमधील २२ लाखांहून अधिक नावे वगळली

ओदिशा, मणिपूर, मिझोराम आणि सिक्कीममध्ये एसआयआर मोहिमेअंतर्गत २२ लाखांहून अधिक लोकांची नावे मतदार यादीतून वगळण्यात आली आहेत. ज्यांची नावे मसुदा यादीतून वगळण्यात आली आहेत, त्यांना त्यांची नावे पुन्हा समाविष्ट करण्याची संधी दिली जाईल.

त्यानंतर या राज्यांची अंतिम मतदार यादी प्रसिद्ध केली जाईल, असे निवडणूक आयोगाने स्पष्ट केले आहे.गेल्या वर्षी जूनमध्ये निवडणूक आयोगाने विशेष सघन पुनरीक्षण (डखठ)एसआयआर मोहीम सुरू केली होती. ही मोहीम बिहार, बंगाल, आसाम आणि उत्तर प्रदेश यांसारख्या राज्यांमध्ये पूर्ण झाली आहे. एसआयआर मोहिमेअंतर्गत, चार राज्यांमधील



२२ लाखांहून अधिक मतदारांची नावे वगळण्यात आली आहेत. निवडणूक आयोगाने गेल्या वर्षभरात एसआयआर मोहिमेद्वारे देशभरातील १३ राज्यांमधील ६ कोटी नावे वगळली आहेत.

विशेष सुधारणा कार्यक्रमांतर्गत बिहारमध्ये ६५ लाख मतदारांची नावे वगळण्यात आली. त्याचप्रमाणे, पश्चिम बंगालमध्ये ३७ लाख मतदारांची नावे वगळण्यात आली. उत्तर प्रदेशमध्येही २५ लाख मतदारांची नावे मतदार यादीतून वगळण्यात आली आहेत. एकूण, १३ राज्यांमध्ये विशेष सुधारणा कार्यक्रमांतर्गत मतदार यादीतून अंदाजे ६ कोटी लोकांची नावे वगळण्यात आली आहेत.

इंडिया आघाडीतील २३ विरोधी पक्षांनी एसआयआर संदर्भात सरन्यायाधीशांना एक पत्र लिहिले आहे. या पक्षांचा आरोप आहे

## ७ लाखांच्या कारसह गुटखा जप्त; बार्शी नाका परिसरात पेठ बीड पोलिसांची कारवाई

बीड । प्रतिनिधी

शहरातील बार्शी नाका परिसरात पेठ बीड पोलिसांनी गुटख्याची अवैध वाहतूक करणाऱ्या कारवर धाड टाकून सुमारे ७ लाख ८ हजार ४०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या कारवाईत चालकाला ताब्यात घेण्यात आले असून त्याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीसांना मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार बार्शी नाका येथून सोलापूर महामार्गाकडे जाणाऱ्या रस्त्यावर गुटख्याची वाहतूक होत असल्याची माहिती मिळाली होती. त्यानुसार छत्रपती राजर्षी शाहू बँकेसमोर सापळा रचून संशयित एमएच १२ डब्ल्यूएक्स ४८५३ क्रमांकाची कार अडविण्यात आली.

कारची झडती घेतली असता मानवी आरोग्यास अपायकारक असलेला प्रतिबंधित गुटखा सापडला. यामध्ये ८ हजार ४०० रुपयांचा गुटखा आणि ७ लाख रुपयांची कार असा एकूण ७ लाख ८ हजार ४०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

या प्रकरणी विकास बाबन जाधव (वय ३२, रा. इमामपूर रोड, बीड) याला अटक करण्यात आली आहे. अन्न सुरक्षा अधिकारी अजय गाढे यांच्या फिर्यादीवरून पेठ बीड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.दरम्यान, या अवैध गुटखा तस्करीमागील मुख्य उत्पादक, पुरवठादार आणि संपूर्ण रॅकेटचा शोध घेऊन त्यांच्यावर महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा (मकोका) अंतर्गत कठोर कारवाई करण्याची मागणी फिर्यादीत करण्यात आली आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पेठ बीड पोलीस करीत आहेत.

## ११६ दिवसांच्या आंदोलनाला यश

## समग्र शिक्षण कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या सेवेला मंत्रिमंडळाची मंजुरी

मुंबई, दि. ६ जुलै : समग्र शिक्षण संघर्ष समिती, महाराष्ट्र राज्यच्या वतीने मुंबईतील आझाद मैदानावर ९ मार्च ते २ जुलै २०२६ या कालावधीत तब्बल ११६ दिवस सुरू असलेल्या आंदोलनाला अखेर यश मिळाले आहे. महाराष्ट्र राज्य मंत्रिमंडळाने समग्र शिक्षणमधील उर्वरित कंत्राटी कर्मचाऱ्यांसाठी कायमस्वरूपी पदनिर्मितीस मान्यता देत त्यांची शासकीय सेवेत नियुक्ती कायम ठेवण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे.

या निर्णयामुळे राज्यातील सुमारे ३ हजार कंत्राटी कर्मचाऱ्यांना मोठा दिलासा मिळणार असून, जिल्ह्यातील ९१ कर्मचाऱ्यांनाही त्याचा थेट लाभ होणार आहे. ही माहिती संघटनेचे जिल्हाध्यक्ष व राज्य पदाधिकारी महेश पाटील यांनी दिली.

समग्र शिक्षणमधील कंत्राटी कर्मचारी ९ मार्चपासून राज्याध्यक्ष योगिता बालक्षे, शिवशरण गोसावी, सुनील दराडे, महेश पाटील, विवेक राऊत, विश्वदीप गोंडाणे, नीता देशमुख, जनार्दन तानपुरे आदींच्या नेतृत्वाखाली आझाद मैदान येथे आंदोलन करत होते. कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी सातत्याने पाठपुरावा करण्यात आला.

राज्याचे जलसंपदा मंत्री गिरीश भाऊ महाजन, शालेय शिक्षण मंत्री दादासाहेब भुसे तसेच संबंधित जिल्ह्याचे आमदार सत्यजित देशमुख यांनी आंदोलनस्थळी भेट देऊन शासनाच्या निर्णयाची माहिती आंदोलनकर्त्यांना दिली. कर्मचाऱ्यांच्या मागण्यांना त्यांनी सुरुवातीपासून पाठिंबा दिल्याचे आंदोलनकर्त्यांनी सांगितले.

समग्र शिक्षण संघर्ष समितीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, सुनेत्राताई पवार, शालेय शिक्षण मंत्री दादासाहेब भुसे, शिक्षण राज्यमंत्री पंकज भाऊ भोयर, जलसंपदा मंत्री गिरीश भाऊ महाजन, आमदार सत्यजित देशमुख तसेच आमदार विनय कोरे यांचे सहकार्याबद्दल आभार व्यक्त केले.

या निर्णयामुळे गेली दोन दशके अनिश्चिततेत सेवा बजावणाऱ्या समग्र शिक्षणमधील कंत्राटी कर्मचाऱ्यांना मोठा दिलासा मिळाला.

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग ॲण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड – ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

दैनिक समर्थ राजयोग
SAMARTH RAJYOG
राजमान्य-राजश्री
बीड (महाराष्ट्र)
BEED (MAHARASHTRA )


# शेतकऱ्यांनो आत्महत्या करू नका-ना.नितीन गडकरी

## ना.विजेंदर गुप्ता व भाजपचे राष्ट्रीय प्रवक्ते खा.डॉ.सुधांशू त्रिवेदी यांच्या हस्ते माजी आ.भीमराव धोंडे यांना महाराष्ट्र गौरव पुरस्कार प्रदान

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) शेतकऱ्यांनो आत्महत्या करू नका. केंद्र सरकार मका, बांबूपासून इथेनॉल निर्मितीला चालना देत असून अशा उत्पादनांकडे शेतकऱ्यांनी वळावे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली रोजगारनिर्मिती आणि शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्यासाठी सरकार सातत्याने प्रयत्नशील आहे, असे प्रतिपादन केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री ना. नितीन गडकरी यांनी केले.

दिल्ली येथील हयात रिजनसी हॉटेलमध्ये नवभारत मीडिया ग्रुपतर्फे आयोजित भव्य महाराष्ट्र गौरव पुरस्कार सोहळ्यात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा यावेळी गौरव करण्यात आला. याच सोहळ्यात आष्टी-पाटोदा-शिरूर विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार भीमराव धोंडे यांना शैक्षणिक, सामाजिक, राजकीय, कृषी व धार्मिक क्षेत्रातील गेल्या ४५ वर्षांतील उल्लेखनीय योगदानाबद्दल महाराष्ट्र गौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला.

दिल्ली विधानसभा अध्यक्ष ना. विजेंदर गुप्ता आणि भाजपचे राष्ट्रीय प्रवक्ते तथा खासदार डॉ. सुधांशू त्रिवेदी यांच्या हस्ते हा पुरस्कार माजी आ. भीमराव धोंडे यांनी स्वीकारला. यावेळी सौ. दमयंतीताई धोंडे, अभयराजे धोंडे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

या कार्यक्रमास भारत सरकारचे संचार मंत्री ना. ज्योतिरादित्य सिंधिया, केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री ना. अनुप्रिया पटेल, केंद्रीय आयुष राज्यमंत्री (स्वतंत्र प्रभार) ना. प्रतापराव जाधव, केंद्रीय पेट्रोलियम मंत्री ना. हरदीपसिंग पुरी, सिनेअभिनेत्री भूमी पेडणेकर, माजी केंद्रीय मंत्री स्मृती इराणी, नवभारत मीडिया ग्रुपचे पदाधिकारी तसेच देशभरातील विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

यावेळी नवभारत मीडिया ग्रुपतर्फे प्रकाशित करण्यात आलेल्या कॉफी टेबल बुक चे प्रकाशन ना. नितीन गडकरी यांच्या हस्ते करण्यात आले. या निमित्ताने ना. नितीन गडकरी, ना. ज्योतिरादित्य सिंधिया, ना. अनुप्रिया पटेल, ना. प्रतापराव जाधव, ना. विजेंदर गुप्ता, डॉ. सुधांशू त्रिवेदी यांच्यासह विविध मान्यवरांच्या विशेष मुलाखतीही घेण्यात आल्या.

आपल्या मनोगतात ना. नितीन गडकरी म्हणाले की, १९९५ मध्ये महाराष्ट्रात मंत्री झाल्यानंतर माझ्या खात्याकडे अवघा २३०० कोटी रुपयांचा निधी होता. आज त्याच खात्याकडे तब्बल १५ लाख कोटी रुपयांचे नियोजन आहे. देशभरात मोठ्या प्रमाणावर राष्ट्रीय महामार्गांची उभारणी सुरू असून काश्मीर ते कन्याकुमारी असा आधुनिक रस्ते विकास करण्याचे उद्दिष्ट आहे. प्रदूषण कमी करण्यासाठी पर्यायी इंधनावर भर देण्यात येत असून मका व बांबूपासून इथेनॉल निर्मितीला प्रोत्साहन दिले जात आहे. शेतकऱ्यांनी आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलू नये. सरकार त्यांच्या पाठीशी ठामपणे उभे आहे.



भारत सरकारचे संचार मंत्री ना. ज्योतिरादित्य सिंधिया यांनी विकसित भारत-२०४७ या संकल्पनेची माहिती देत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देश सर्वांगीण विकासाच्या दिशेने वाटचाल करत असल्याचे सांगितले.

केंद्रीय आयुष राज्यमंत्री (स्वतंत्र प्रभार) ना. प्रतापराव जाधव यांनी प्रत्येक जिल्ह्यात ५० खाटांचे आयुष रुग्णालय उभारण्याची योजना लवकरच राबविण्यात येणार असल्याची माहिती दिली. देशातील प्रत्येक नागरिक निरोगी राहावा, हा केंद्र सरकारचा प्रयत्न असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

केंद्रीय आरोग्य मंत्री ना. अनुप्रिया पटेल यांनी समाजातील विविध क्षेत्रांतील उल्लेखनीय कार्याचा सन्मान करणाऱ्या नवभारत मीडिया ग्रुपच्या उपक्रमाचे कौतुक केले. बदलती जीवनशैली लक्षात घेता प्रत्येकाने संतुलित व सकस आहार घेऊन निरोगी जीवन जगण्याचा संदेश त्यांनी दिला. सिनेअभिनेत्री भूमी पेडणेकर यांनी मुलींच्या शिक्षणावर भर देण्याचे आवाहन केले. पालकांनी मुलींना उच्च शिक्षण देऊन स्वावलंबी बनवावे तसेच सोशल मीडियाच्या वाढत्या प्रभावामुळे लहान मुलांवर होणाऱ्या परिणामाबाबतही त्यांनी चिंता व्यक्त केली.कार्यक्रमादरम्यान नवभारतच्या पत्रकार माधवी वाडकर यांनी माजी आ. भीमराव धोंडे यांची विशेष मुलाखत घेतली. नवभारत ग्रुपचे मॅनेजिंग डायरेक्टर निमिष माहेश्वरी, समूह अध्यक्ष ए. श्रीनिवास, संचालक वैभव माहेश्वरी, निवासी संपादक संजय तिवारी, सरव्यवस्थापक कल्याण पांडे, बीड जिल्हा प्रतिनिधी रवि उबाळे आदींनी माजी आ. भीमराव धोंडे, सौ. दमयंतीताई धोंडे व अभयराजे धोंडे यांचा सत्कार केला.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आनंद सिंग यांनी केले. यावेळी पाटोदा कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती पांडुरंग नागरगोजे, पाटोदा पंचायत समितीचे माजी सभापती अनिल जायभाय, प्रा. राजू पाचे, पत्रकार दिगंबर बोडखे, प्रा. जफर शेख, संभाजी वनवे, प्रा. राहुल निकाळजे यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते. देशपातळीवरील प्रतिष्ठेचा महाराष्ट्र गौरव पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल माजी आमदार भीमराव धोंडे यांच्यावर बीड जिल्ह्यासह मराठवाडाभरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# वाढदिवस नव्हे समाजसेवेचा महाउत्सव

जामखेड प्रतिनिधी :-

वाढदिवस म्हणजे केवळ केक कापणे आणि शुभेच्छांचा वर्षाव नव्हे तर समाजाप्रती आपली बांधिलकी कृतीतून व्यक्त करण्याची संधी असते हे आदर्श इंग्लिश स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज जामखेडचे सर्वेसर्वा डॉ. गंगाधरजी पाढरे यांनी पुन्हा एकदा सिद्ध करून दाखवले. त्यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबिर वृक्षारोपण आणि गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप अशा विविध समाजोपयोगी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमांना नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत ४६ विविध प्रकारच्या वृक्षांची लागवड करण्यात आली. कदंब, फणस, चिकू, अंजीर, अशोक, बकुळ, नारळ आदी पर्यावरणपूरक वृक्षांची लागवड करून हरित भवितव्याचा संकल्प करण्यात आला. वृक्षारोपणातून निसर्ग संवर्धनाची जबाबदारी प्रत्येकाने स्वीकारावी असा प्रभावी संदेश देण्यात आला.

यावेळी आयोजित रक्तदान शिबिरात अनेक रक्तदात्यांनी स्वयंस्फूर्तीने सहभाग घेत रक्तदान हेच श्रेष्ठ दान या विचाराला प्रत्यक्ष कृतीची जोड दिली. तसेच गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करून त्यांच्या शिक्षणाला बळ देण्याचा स्तुत्य उपक्रमही राबविण्यात आला. या उपक्रमामुळे अनेक विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद



डॉ.गंगाधरजी पाढरे यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान वृक्षारोपण आणि शैक्षणिक साहित्य वाटपाचा प्रेरणादायी उपक्रम

फुलला.कार्यक्रमाला संस्थेचे कार्याध्यक्ष रामेश्वर वैद्य, संचालिका आशाताई पाढरे, मुख्याध्यापिका ज्योतिसिंह हजारी, व्यवस्थापक तुळशीराम पांढरे, ऋषिभैय्या, ओम पाढरे, युवराज पाढरे तसेच संस्थेचे सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

समाजसेवा, पर्यावरण संरक्षण आणि शिक्षण या तिन्ही मूल्यांचा सुंदर संगम घडवून आणणारा हा उपक्रम उपस्थितांसाठी प्रेरणादायी ठरला. वाढदिवस साजरा करण्याची सामाजिक जाणीव अधिक समृद्ध करणारा हा आदर्श उपक्रम भविष्यातही अनेकांसाठी प्रेरणेचा दीप ठरेल, अशी भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

# शिक्षणमहर्षी तथा माजी आ.श्री.भीमराव धोंडे आणि सौ.दमयंती धोंडे

## शिक्षण,संस्कार,समाजसेवा व नेतृत्वाचा प्रेरणादायी वारसा

आष्टी - (एस.राजेंद्र लाड)

शिक्षणाच्या माध्यमातून समाजपरिवर्तन घडविण्याचा ध्यास, जनतेच्या सुख-दुःखाशी कायम नाळ जोडणारे लोकनेतृत्व आणि सेवाभावी विचारांची आयुष्यभर जोपासना करणारे शिक्षणमहर्षी तथा माजी आमदार श्री. भीमराव धोंडे व त्यांच्या सहचारिणी सौ. दमयंती धोंडे यांनी आपल्या कार्यातून आष्टी तालुक्यासह संपूर्ण बीड जिल्ह्याच्या सामाजिक, शैक्षणिक आणि राजकीय क्षेत्रावर अमिट ठसा उमटविला आहे. त्यांच्या कार्याचा प्रभाव आजही अनेक पिढ्यांना प्रेरणा देणारा ठरत आहे.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षणाची संधी मिळावी, शिक्षणाच्या अभावामुळे एकाही विद्यार्थ्याचे भविष्य अंधारात जाऊ नये आणि शिक्षणातून सुसंस्कारित समाज घडावा, या उदात्त ध्येयाने श्री. भीमराव धोंडे यांनी आयुष्यभर कार्य केले. शिक्षणसंस्थांची उभारणी, शैक्षणिक गुणवत्तेला प्रोत्साहन, विद्यार्थ्यांना आवश्यक सुविधा, शिक्षकांचा सन्मान आणि ग्रामीण शिक्षणाच्या विकासासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले. त्यामुळे त्यांना शिक्षणमहर्षी म्हणून समाजाने गौरविले.

माजी आमदार म्हणून कार्य करताना त्यांनी विकासाला प्राधान्य देत शिक्षण, रस्ते, पाणीपुरवठा, कृषी, सहकार आणि सामाजिक विकासाच्या विविध योजनांना गती दिली. जनतेच्या समस्या समजून घेऊन त्यांचे निराकरण करण्यासाठी त्यांनी सदैव लोकाभिमुख भूमिका घेतली. त्यांचा साधेपणा, प्रामाणिकपणा आणि लोकांशी असलेला आत्मीय संवाद यामुळे त्यांना सर्व स्तरातून आदर मिळाला.

या सर्व कार्यामागे सौ. दमयंती धोंडे यांची मोलाची साथ लाभली. त्यांनी कुटुंबाची जबाबदारी समर्थपणे सांभाळतानाच सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेतला. महिलांमध्ये शिक्षण, संस्कार, सामाजिक जाणीव आणि सेवाभाव रुजविण्यासाठी त्यांनी सातत्याने कार्य केले. त्यांच्या शांत, संयमी आणि सेवाभावी स्वभावामुळे त्या अनेक महिलांसाठी प्रेरणास्थान ठरल्या.

धोंडे दाम्पत्याने आपल्या कुटुंबातही सामाजिक बांधिलकी, प्रामाणिकपणा, कर्तव्यनिष्ठा आणि जनसेवेचे संस्कार रुजविले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली घडलेले त्यांचे सुपुत्र महेश सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन डॉ. अजय दादा धोंडे आणि युवा नेते अभय राजे धोंडे हे आज विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करत आहेत.

डॉ. अजय दादा धोंडे यांनी सहकार क्षेत्रात सक्षम नेतृत्व सिद्ध करत महेश सहकारी साखर



कारखान्याच्या माध्यमातून शेतकरी हित, औद्योगिक विकास आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना देण्यासाठी मोलाचे योगदान दिले आहे. त्याचबरोबर सामाजिक, शैक्षणिक आणि जनहिताच्या विविध उपक्रमांमध्येही त्यांचा सक्रिय सहभाग असतो.

तर युवा नेते अभय राजे धोंडे यांनी नव्या पिढीचे नेतृत्व स्वीकारत राजकीय, सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक क्षेत्रात प्रभावी कार्य सुरू ठेवले आहे. युवकांना संघटित करणे, सामाजिक उपक्रम राबविणे, धार्मिक कार्यक्रमांना पाठबळ देणे, शिक्षण क्षेत्रातील उपक्रमांना प्रोत्साहन देणे आणि सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांसाठी सातत्याने प्रयत्न करणे, यामुळे त्यांनी अल्पावधीतच जनमानसात आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे.

आज डॉ. अजय दादा धोंडे आणि अभय राजे धोंडे हे दोघेही आपल्या आई-वडिलांच्या आदर्श विचारांचा वारसा समर्थपणे पुढे नेत आहेत. राजकीय, सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक आणि सहकार क्षेत्रात लोकहिताला प्राधान्य देत ते सातत्याने कार्यरत असून, जनतेशी असलेली त्यांची आत्मीय नाळ आणि सेवाभावी वृत्ती ही श्री. भीमराव धोंडे व सौ. दमयंती धोंडे यांनी दिलेल्या संस्कारांचीच साक्ष आहे.

धोंडे कुटुंबाने उभारलेला शिक्षण, समाजसेवा, सहकार आणि लोककल्याणाचा भक्कम पाया आजही समाजासाठी प्रेरणादायी ठरत आहे. श्री. भीमराव धोंडे आणि सौ. दमयंती धोंडे यांनी जपलेले मूल्याधिष्ठित जीवन, लोकसेवेची अखंड परंपरा आणि शिक्षणाच्या माध्यमातून समाज घडविण्याचा ध्यास हा त्यांच्या पुढील पिढीकडूनही तेवढ्याच समर्पणाने पुढे नेला जात आहे. त्यामुळे धोंडे कुटुंब हे आष्टी तालुक्यासह बीड जिल्ह्यात शिक्षण, समाजसेवा, सहकार आणि जनसेवेचे प्रेरणादायी प्रतीक म्हणून ओळखले जाते.

# बीडच्या विराज आजबे याने स्पर्धा परीक्षांत घवघवीत यश मिळवत गाठले यशाचे नवे शिखर

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) बीड येथील पोदार इंटरनॅशनल स्कूलचा गुणवंत विद्यार्थी चि. विराज अश्विनी भारत आजबे याने शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये विविध राष्ट्रीय व राज्यस्तरीय स्पर्धा परीक्षा, शिष्यवृत्ती परीक्षा तसेच ऑलिम्पियाड स्पर्धांमध्ये उल्लेखनीय यश संपादन करून बीड जिल्ह्याचे नाव उज्ज्वल केले आहे. विराजच्या या दैदिप्यमान कामगिरीमुळे त्याच्यावर सर्व स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत असून, विद्यार्थ्यांसाठी तो प्रेरणादायी ठरत आहे.

विराजने राष्ट्रीय मिलिटरी स्कूल प्रवेश परीक्षेत १५० पैकी १३१ गुण, ऑल इंडिया सैनिक स्कूल प्रवेश परीक्षेत ३०० पैकी २७२ गुण, नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षेत १०० पैकी ९५ गुण, तसेच ग्रीन ऑलिम्पियाड परीक्षेत १०० पैकी ९६ गुण मिळवत उत्कृष्ट यश मिळवले. या यशाच्या बळावर पोदार इंटरनॅशनल स्कूलमध्ये इयत्ता पहिली ते दहावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांमधून त्याने प्रथम क्रमांक पटकावला.

याशिवाय पाचवी शिष्यवृत्ती परीक्षेत २९८ पैकी २४२ गुण मिळवत बीड जिल्ह्यात सहावा क्रमांक प्राप्त करून शिष्यवृत्तीस पात्रता मिळवली. तसेच मंथन परीक्षा इंग्रजी माध्यमातून ३०० पैकी २५४ गुण मिळवत राज्यात २३ वा क्रमांक पटकावून आणखी एक मानाचा टप्पा गाठला.

विराजने केवळ प्रवेश परीक्षा किंवा शिष्यवृत्तीपुरतेच यश मर्यादित न ठेवता गणित, विज्ञान, इंग्रजी, हिंदी, सामाजिक शास्त्र, कॉम्प्युटर आणि जनरल नॉलेज या सर्व विषयांच्या ऑलिम्पियाड परीक्षांमध्ये गोल्ड मेडल मिळवत



## लोकनेते आ.सुरेश धस यांनी केला त्याचा सन्मान

आपल्या सर्वांगीण गुणवत्तेचा ठसा उमटवला आहे.

त्याच्या सातत्यपूर्ण मेहनती, जिद्द आणि गुणवत्तेच्या जोरावर सैनिक स्कूल, चंद्रपूर येथे त्याचा प्रवेश निश्चित झाला आहे. ही बाब त्याच्या कुटुंबीयांसाठी, शाळेसाठी तसेच बीड जिल्ह्यासाठी अभिमानाची ठरली आहे. विराजच्या या उज्ज्वल यशाबद्दल आ. सुरेश आण्णा धस यांनी त्याचे मनःपूर्वक अभिनंदन करून पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या.

विराजसारखे विद्यार्थी आपल्या गुणवत्तेच्या बळावर जिल्ह्याचे नाव राष्ट्रीय स्तरावर उज्ज्वल करत आहेत. त्यांच्या या यशातून इतर विद्यार्थ्यांनाही प्रेरणा मिळेल आणि अधिकाधिक विद्यार्थी स्पर्धा परीक्षांकडे आत्मविश्वासाने वाटचाल करतील, असा विश्वास आ. सुरेश आण्णा धस यांनी व्यक्त केला. विराज आजबेच्या या दैदिप्यमान यशामुळे बीड जिल्ह्याच्या शैक्षणिक क्षेत्रात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला असून, त्याच्या उज्ज्वल भविष्यासाठी सर्व स्तरांतून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.



### खाजगी माध्यमिक शाळांच्या शालेय पोषण आहार बैठकीत

# नवनिर्वाचित गटशिक्षणाधिकारी श्री.वैभव बाचकर यांचा सत्कार

आष्टी - (एस.राजेंद्र लाड)

आष्टी येथील गटशिक्षणाधिकारी कार्यालयाच्या वतीने खाजगी माध्यमिक शाळेतील मुख्याध्यापकांची शालेय पोषण आहार संदर्भात मंगळवार दिनांक ७ जुलै २०२६ रोजी पीएम श्री जिल्हा परिषद कन्या प्रशाला आष्टी येथे बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीच्या अनुषंगाने नवनिर्वाचित गटशिक्षणाधिकारी श्री. वैभव बाचकर यांचा पुष्पगुच्छ देऊन व शाल प्रदान करून सन्मानपूर्वक सत्कार करण्यात आला.

यावेळी उपस्थित मुख्याध्यापकांनी श्री. बाचकर साहेबांचे स्वागत करत त्यांना नवीन जबाबदारीसाठी शुभेच्छा देत शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करण्याचा विश्वास व्यक्त केला.

बैठकीत शालेय पोषण आहार योजनेंतर्गत विद्यार्थ्यांना दर्जेदार, पौष्टिक व स्वच्छ आहार वेळेत उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक बाबींवर सविस्तर चर्चा करण्यात आली. शासनाने दिलेल्या मार्गदर्शक सूचनांची प्रभावी अंमलबजावणी, विद्यार्थ्यांच्या आरोग्याची काळजी, पोषण आहाराच्या गुणवत्तेचे नियमित परीक्षण, अन्नधान्य साठवणूक, स्वच्छता, नोंदवहीचे व्यवस्थापन तसेच योजनेंतर्गत उद्भवणाऱ्या अडचणींवर उपाययोजना याविषयी मार्गदर्शन करण्यात आले.

यावेळी गटशिक्षणाधिकारी श्री. वैभव बाचकर यांनी शालेय पोषण आहार ही विद्यार्थ्यांच्या आरोग्याशी निगडित अत्यंत महत्त्वाची योजना असल्याचे सांगितले. विद्यार्थ्यांना सुरक्षित, पौष्टिक आणि गुणवत्तापूर्ण आहार मिळणे ही प्रत्येक शाळेची जबाबदारी असून शासनाच्या सर्व सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्याचे आवाहन त्यांनी केले. तसेच शाळांमध्ये पारदर्शकता, शिस्त आणि गुणवत्तेला प्राधान्य देत शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सर्वांनी समन्वयाने काम करण्याची अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

यावेळी सांगवी पाटण येथील सुदर्शन विद्यालयाचे मुख्याध्यापक साईनाथ बोडखे, पोखरी येथील यशवंत माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य जगताप आर.आर., आष्टी येथील महात्मा गांधी विद्यालयाचे मुख्याध्यापक जावेद पठाण तसेच शालेय पोषण आहार विभाग प्रमुख शिवाजी आव्हाड आदी मान्यवरांनी गटशिक्षणाधिकारी बाचकर यांचा सत्कार करून त्यांना पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी खाजगी माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापक मोठ्या संख्येने उपस्थित होते. बैठक सकारात्मक वातावरणात पार पडली. शालेय पोषण आहार योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी सर्व मुख्याध्यापकांनी प्रशासनाला आवश्यक ते सहकार्य करण्याची ग्वाही दिली. या बैठकीमुळे शाळांमधील पोषण आहार योजनेच्या कामकाजात अधिक समन्वय निर्माण होऊन विद्यार्थ्यांना दर्जेदार सुविधा उपलब्ध करून देण्यास निश्चितच मदत होईल, असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला.

# दिवसांच्या लढ्याला यश अखेर प्रशासन झुकले लेखी आश्वासनानंतर काकासाहेब साबळे यांचे आमरण उपोषण मागे

## ७/१२ कोरे करण्यासह पीकविमा प्रश्नावर जिल्हाधिकाऱ्यांकडे प्रस्ताव प्रशासनाला १० दिवसांचा अल्टिमेटम

**भोकरदन ।इसरारखान पठाण**

**अखेर पाच दिवसांच्या ऐतिहासिक आणि निर्धारपूर्ण आमरण उपोषणापुढे प्रशासनाला माघार घ्यावी लागली. शेतकऱ्यांच्या न्याय्य हक्कांसाठी तहसील कार्यालयासमोर आमरण उपोषणाला बसलेले काकासाहेब गणपत साबळे पाटील यांनी प्रशासनाकडून लेखी आश्वासन मिळाल्यानंतर सोमवारी दि.६ जुलै सायंकाळी आपले उपोषण मागे घेतले. कर्जमाफीनंतर ७/१२ कोरे करणे तसेच सन २०२४ व २०२५ चा पीकविमा मंजूर करणे या प्रमुख मागण्यांवर प्रशासनाने सकारात्मक भूमिका घेत जिल्हाधिकारी कार्यालयाकडे प्रस्ताव पाठविल्याचे स्पष्ट केले.**

नायब तहसीलदार बालाजी पूपलवाड आणि शामराव दळवी महाराज यांनी उपोषणस्थळी येऊन काकासाहेब साबळे यांना फळांचा रस पाजून उपोषणाची सांगता केली.मात्र केवळ तोंडी नव्हे तर लेखी आश्वासन मिळाल्यानंतरच उपोषण मागे घेण्याचा ठाम निर्णय साबळे यांनी घेतल्याने त्यांच्या भूमिकेची सर्वत्र चर्चा रंगली.

उपोषणादरम्यान शेतकरी, सामाजिक संघटनांचे पदाधिकारी आणि विविध राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींनी मध्यस्थी करत प्रशासनाशी चर्चा केली. अखेर प्रशासनाला मागण्यांवर कार्यवाहीसाठी १० दिवसांचा अवधी देण्यात आला. या कालावधीत ठोस निर्णय न झाल्यास पुन्हा तीव्र आंदोलनाचा इशाराही देण्यात



आला आहे.

तहसील कार्यालयाच्या एमएजी विभागाने काढलेल्या अधिकृत पत्रात, काकासाहेब साबळे यांच्या दि. १ जुलै २०२६ रोजीच्या निवेदनातील मागण्या शासनाच्या धोरणात्मक स्तरावरील असल्याने संपूर्ण प्रस्ताव जिल्हाधिकारी जालना यांच्याकडे तात्काळ सादर करण्यात आल्याचे नमूद करण्यात आले आहे. तसेच उपोषण मागे घेऊन प्रशासनास सहकार्य करण्याची विनंतीही करण्यात आली होती. या पत्राच्या प्रती जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी, पोलीस निरीक्षक आणि ग्रामीण रुग्णालयाच्या वैद्यकीय अधिकाऱ्यांनाही पाठविण्यात आल्या आहेत.

उपोषण सोडविण्याच्या वेळी कडूबा बोरसे आप जिल्हा सचिव, महेश पुरोहित उभाठा तालुकाप्रमुख, सुरेश तळेकर तालुका समन्वयक, मराठा सेवक, वैशाली दाभाडे समाजसेविका, गजानन घोडे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष, समाजसेवक प्यारे नारायण सोनी यांच्यासह शेकडो शेतकरी व कार्यकर्ते उपस्थित होते. सर्वांच्या एकजुटीमुळेच प्रशासनाला लेखी आश्वासन द्यावे लागल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

शेतकऱ्यांच्या हक्कांसाठी उभारलेला हा लढा तात्पुरता स्थगित झाला असला तरी आता सर्वांचे लक्ष प्रशासन पुढील दहा दिवसांत दिलेले आश्वासन कितपत पाळते याकडे लागले आहे. निर्णय न झाल्यास आंदोलनाची पुढील दिशा अधिक आक्रमक असणार असल्याचे संकेतही आंदोलनकर्त्यांनी दिले आहेत.

# बदनापूरचे नवनियुक्त तहसीलदार एस.एस.हंडे यांचा वंचित बहुजन आघाडीच्या वतीने जाहीर सत्कार

बदनापूर ।प्रतिनिधी

बदनापूर तालुक्याचे नवनियुक्त तहसीलदार एस. एस. हंडे यांचा वंचित बहुजन आघाडी, बदनापूर तालुक्याच्या वतीने गुरुवार दि.२ जुलै रोजी शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन उत्साहात सत्कार करण्यात आला.यावेळी उपस्थित पदाधिकाऱ्यांनी तहसीलदार हंडे यांचे स्वागत करत त्यांच्या आगामी प्रशासकीय कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या. तसेच नागरिकाभिमुख पारदर्शक आणि लोकहिताच्या प्रशासनासाठी त्यांच्या नेतृत्वाखाली महसूल विभाग अधिक प्रभावीपणे कार्य करेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.या सत्कार सोहळ्यास वंचित बहुजन आघाडीचे तालुका महासचिव दीपक खाजेकर,काकासाहेब अरसूड, सुभाष अरसूड, टेलर रियाजभाई, सरपंच संजय घोरपडे, सागर खाजेकर यांच्यासह वंचित बहुजन आघाडीचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित



होते. उपस्थितांनी नवनियुक्त तहसीलदारांचे पुष्पगुच्छ व शुभेच्छांनी स्वागत करत त्यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.




# घनसावंगी सामाजिक वनीकरण कार्यालय निस्त नावालाच

**फिल्ड च्या नावाखाली कर्मचारी गायब कागदोपत्री कामांवर लाखोंची उधळण चौकशीची जोरदार मागणी**

घनसावंगी प्रतिनिधी :-

घनसावंगी येथील सामाजिक वनीकरण विभागाचा कारभार अक्षरश रामभरोसे सुरू असल्याचा गंभीर आरोप समोर आला असून फिल्डवर आहोत या कारणाखाली कर्मचारी कार्यालयातून कायम गायब राहत असल्याने शेतकरी व नागरिकांना प्रचंड मनस्ताप सहन करावा लागत आहे. कार्यालयात अधिकारी-कर्मचारी नसल्याने योजनांच्या कामासाठी येणाऱ्या लाभार्थ्यांना वारंवार हेलपाटे मारावे लागत असल्याची संतप्त प्रतिक्रिया व्यक्त होत आहे.

याहून गंभीर बाब म्हणजे प्रत्यक्ष लाभार्थ्यांच्या शेतावर पाहणी न करताच केवळ कागदोपत्री कामे पूर्ण झाल्याचे दाखवून लाखो रुपयांची बिले मंजूर केल्याचा आरोप तक्रारदार भगवत अंबादास वाघमारे यांनी केला आहे. या कथित गैरव्यवहारामुळे शासकीय निधीचा अपव्यय झाल्याचा संशय व्यक्त होत असून संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी जोर धरत आहे.यासंदर्भात वरिष्ठ वन अधिकाऱ्यांकडे पुराव्यानिशी लेखी तक्रार दाखल करण्यात आली आहे.बायोमेट्रिक हजेरीची तपासणी करून कायम गैरहजर राहणाऱ्या कर्मचाऱ्यांवर कारवाई करावी त्यांचे वेतन रोखावे तसेच भ्रष्टाचारात सहभागी असलेल्या अधिकारी-कर्मचाऱ्यांवर कठोर कायदेशीर कारवाई करावी अशी मागणी तक्रारदारांनी केली आहे.

आता या गंभीर आरोपांची निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कारवाई होणार की नेहमीप्रमाणे हे प्रकरणही दडपले जाणार याकडे घनसावंगी तालुक्यासह संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

# लोकशाहीचा गळा घोटणाऱ्या मुजोर अधिकाऱ्याची गय करणार नाही मुख्यमंत्र्यांकडे थेट तक्रार

## जनतेच्या प्रश्नांसाठी आवाज उठवणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्याला खोट्या गुन्ह्यात अडकवले भाऊ फाऊंडेशन पँथर्सचा आक्रमक पवित्रा

भोकरदन इसरारखान पठाण

सार्वजनिक हितासाठी आणि गरिबांच्या न्याय्य हक्कांसाठी आवाज उठवणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्याचा आवाज दाबण्यासाठी प्रशासनाकडून सत्तेचा आणि पदाचा गैरवापर केला जात असल्याचा संतापजनक प्रकार भोकरदनमध्ये समोर आला आहे. भोकरदन नगरपरिषदेच्या मुजोर मुख्याधिकाऱ्यांनी सूडबुद्धीने सामाजिक कार्यकर्ते विकास जाधव यांना खोट्या गुन्ह्यात अडकवल्याचा गंभीर आरोप भाऊ फाऊंडेशन पँथर्स या सामाजिक संघटनेने केला आहे. या हुकूमशाही प्रवृत्तीविरोधात संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष पँथर अनिल पगारे यांनी थेट राज्याच्या मुख्यमंत्र्यांकडे धाव घेत उच्चस्तरीय चौकशीची मागणी केली आहे.

भोकरदन तालुक्यातील वंचित, गरीब आणि शोषितांच्या प्रश्नांवर लढणारे कार्यकर्ते विकास जाधव यांनी न्यू हायस्कूल व शिवा प्राथमिक शाळेकडे जाणाऱ्या रस्त्यावरील विद्यार्थ्यांची गैरसोय आणि म्हाडा रोड परिसरातील पाणी साचण्याच्या गंभीर समस्येकडे प्रशासनाचे लक्ष वेधले होते.मात्र जनतेच्या प्रश्नांची सोडवणूक करण्याऐवजी स्वतःचे अपयश झाकण्यासाठी मुख्याधिकाऱ्यांनी पदाचा गैरवापर केला. जाधव यांच्यावर जाणीवपूर्वक खोटे आरोप लावून भारतीय न्याय संहिता



२०२३ च्या कलम ३५३ अंतर्गत गुन्हा दाखल केला असा खळबळजनक आरोप निवेदनात करण्यात आला आहे.

प्रश्न विचारणाऱ्या नागरिकांचा आणि सामाजिक कार्यकर्त्यांचा आवाज दाबण्याचा प्रयत्न होत असेल तर तो लोकशाहीचा खून आहे. प्रशासनाने या प्रकरणाची वस्तुनिष्ठ चौकशी करून तात्काळ सत्य बाहेर आणावे अन्यथा लोकांचा प्रशासनावरील विश्वास उडेल आणि तीव्र आंदोलन छेडण्यात येईल

पँथर अनिल पगारे राष्ट्रीय अध्यक्ष भाऊ फाऊंडेशन पँथर्स

भाऊ फाऊंडेशन पँथर्सच्या

खोटे गुन्हे मागे घ्या सामाजिक कार्यकर्ते विकास जाधव यांच्यावर राजकीय व प्रशासकीय दबावापोटी दाखल केलेले खोटे गुन्हे तात्काळ मागे घेण्यात यावेत.

मुख्याधिकाऱ्यांची चौकशी करा: पदाचा गैरवापर करून खोटे गुन्हे दाखल करणाऱ्या संबंधित मुख्याधिकाऱ्यांची उच्चस्तरीय चौकशी करून त्यांच्यावर कठोर प्रशासकीय व कायदेशीर कारवाई करावी.

सामाजिक कार्यकर्त्यांना संरक्षण द्या भविष्यात कोणत्याही सामाजिक कार्यकर्त्याला लोकशाही मार्गाने आंदोलन करताना अशा प्रकारे त्रास दिला जाणार नाही याचे स्पष्ट निर्देश प्रशासनाला द्यावेत.

या निवेदनाच्या प्रती मुख्य सचिव, नगरविकास विभाग, जालना जिल्हाधिकारी, छत्रपती संभाजीनगरचे विभागीय आयुक्त यांच्यासह भोकरदनचे उपविभागीय अधिकारी, तहसीलदार आणि उपविभागीय पोलीस अधिकाऱ्यांना पाठवण्यात आल्या असून प्रशासनाने वेळीच पावले न उचलल्यास पँथर्स स्टाईलने तीव्र संघर्ष करण्याचा इशारा संघटनेने दिला आहे.

# अंबड नगर परिषदेचा मुख्य रस्त्यावरील अतिक्रमणावर हातोडा मग सर्व्हे नं. ३९/२ मधील धनदांडग्या बागडबिल्ल्यांना अभय का?

अंबड ।प्रतिनिधी

शहरातील बस स्थानकासमोरील मुख्य रस्त्यावरील अतिक्रमण हटवून प्रशासनाने रस्ता मोकळा केला याबद्दल नगर परिषदेचे कौतुक झाले खरे.पण हाच सिंघम अवतार दाखवणारे नगर परिषद प्रशासन शहरातील वजनदार आणि धनदांडग्यांसमोर मात्र अचानक लाचार का होते? असा संतप्त सवाल आता अंबडकर जनतेतून विचारला जात आहे. गरीब दिसला की चालवा हातोडा आणि धनदांडगा दिसला की फिरवा पाठ असाच काहीसा दुटप्पी आणि पक्षपाती कारभार सध्या अंबड नगर परिषदेत सुरू असल्याचे चित्र आहे.ओपन स्पेस गिळंकृत प्रशासन डोळ्यांवर पट्टी बांधून

शहरातील जालना-अंबड रोडवरील सर्व्हे नंबर ३९/२ मधील ओपन स्पेस खुली जागा वर काही बड्या प्रस्थांनी आणि धनदांडग्या बागडबिल्ल्यांनी उघडउघड अतिक्रमण केले आहे. सार्वजनिक वापराची ही कोट्यवधी रुपयांची जागा गिळंकृत करण्याचा पद्धतशीर प्रयत्न सुरू असताना नगर परिषदेचा अतिक्रमण विभाग मात्र डोळ्यांवर पट्टी बांधून कुंभकर्णी झोपेत ढोल वाजवत आहे.जनतेचा थेट सवाल

बस स्थानकासमोरील छोट्या-मोठ्या दुकानदारांवर गरिबांवर धडक कारवाई करणारे प्रशासन सर्व्हे नं.३९/२ मधील या व्ही.आय.पी. अतिक्रमणधारकांसमोर नेमके कोणाच्या दबावाखाली वाकले आहे? की येथील धनदांडग्यांना कायद्याचा कोणताही डर उरलेला नाही तक्रारींची रद्दी दखल घेणार कधी अंबड नगर परिषद






प्रशासनाकडे शहरातील अशा शेकडो बेकायदेशीर अतिक्रमणांच्या तक्रारी धूळ खात पडल्या आहेत. जागरूक नागरिकांनी वारंवार लेखी तक्रारी देऊनही नगर परिषद प्रशासन या तक्रारींना केराची टोपली दाखवत आहे. सामान्य जनतेने दाद मागायची कुठे? तक्रारींची दखल न घेण्यामागे नक्की कोणते अर्थकारण दडले आहे का अशी शंका घेण्यास आता तीव्र वाव निर्माण झाला आहे.

तर आता तीव्र ठिय्या आंदोलन

प्रशासनाने जर केवळ गरीब विरुद्ध श्रीमंत असा भेद करून कारवाईचे नाटक सुरू ठेवले तर अंबड शहरातील नागरिक आता गप्प बसणार नाहीत. सर्व्हे नं. ३९/२ मधील ओपन स्पेसवरील बेकायदेशीर बांधकाम तात्काळ जमीनदोस्त करण्यात यावे अन्यथा नगर परिषद प्रशासनाच्या या सावत्र भूमिकेविरोधात तीव्र ठिय्या आंदोलन छेडण्याचा इशारा संतप्त नागरिकांनी दिला आहे.शौर्य फक्त गरिबांवरच का? गरिबांचे संसार रस्त्यावर आणताना दाखवलेलं शौर्य या धनदांडग्यांचे अतिक्रमण काढताना कुठे गायब होतं

कायदा सर्वांसाठी समान नाही का? हा उघड पक्षपातीपणा म्हणजे कायद्याची थट्टा नाही काहातोडा कधी पडणार? हा सावत्रपणा थांबणार कधी आणि या बड्या धेंडांच्या अतिक्रमणावर नगर परिषदेचा हातोडा कधी चालणार

आता पाहायचे हे आहे की मुख्याधिकारी आणि अतिक्रमण विरोधी पथक या धनदांडग्यांवर कारवाई करण्याचे धाडस दाखवते की नेहमीप्रमाणे कागदी घोडे नाचवून या प्रकरणावर पांघरूण घालते याकडे संपूर्ण अंबड शहराचे लक्ष लागले आहे.

# शेतकऱ्यांच्या वीज प्रश्नांवर शिवसेनेचा आक्रमक एल्गार महावितरणला धडक निवेदन तातडीने कारवाईची मागणी

बदनापूर संजय भुजाळ :- तालुक्यात दिवसेंदिवस गंभीर होत चाललेल्या वीज समस्यांविरोधात शिवसेनेने आक्रमक भूमिका घेत थेट महावितरण कार्यालयावर धडक दिली. शिवसेना जिल्हाप्रमुख मा. भाऊसाहेब घुगे यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाने महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या उपकार्यकारी अभियंत्यांची भेट घेऊन शेतकऱ्यांच्या विविध प्रलंबित प्रश्नांबाबत सविस्तर निवेदन सादर केले. महावितरणचे शाखा अभियंता श्री. पाटील यांनी हे निवेदन स्वीकारले.

शेतकऱ्यांच्या संयमाचा अंत पाहू नका अन्यथा तीव्र जनआंदोलन छेडले जाईल असा स्पष्ट इशारा देत शिवसेनेने तालुक्यातील जीर्ण झालेल्या विद्युत पोल व तारांची तातडीने दुरुस्ती करण्याची मागणी केली. तसेच सायंकाळी ६ ते १० या वेळेत होणारे लोडशेडिंग त्वरित बंद करून अखंड व सुरळीत वीजपुरवठा सुरू करावा, जिल्हा नियोजन समितीमधून मंजूर झालेल्या सिंगल फेज व थ्री फेज डीपीची रखडलेली कामे तातडीने पूर्ण करावीत, तसेच विद्युत तारांवर झाडांच्या फांद्या आल्यामुळे वारंवार होणारे शॉर्टसर्किट रोखण्यासाठी त्वरित छाटणी मोहीम राबवावी अशा ठोस मागण्या निवेदनाद्वारे करण्यात आल्या.

यावेळी तालुक्यातील मुख्य तसेच गाव रस्त्यांवर सुरू असलेल्या विद्युत पोल उभारणीच्या कामांमध्ये नियमांची पायमल्ली होत असल्याचा गंभीर आरोपही करण्यात आला. आवश्यक परवानग्या न घेता संबंधित कंपन्यांकडून सुरू असलेल्या कामांमुळे नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण झाला असून या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी अशी मागणी शिवसेनेने केली.

यावेळी उपजिल्हाप्रमुख प्रवीण फुके पाटील,उपतालुकाप्रमुख महादू गीते,विधानसभा संघटक कैलास दुधानी,राजाभाऊ थोरात,नंदूभाऊ दाभाडे, शहरप्रमुख अंबादास कोळसकर,युवासेना विधानसभा प्रमुख अमोल दाभाडे, युवासेना उपतालुकाप्रमुख गणेश शिंदे, विभागप्रमुख दीपक डिघे, मनोज शिंदे, रामेश्वर पाटील नागवे, दलित आघाडी तालुका संघटक अनिल हिवराळे, संजय भुजाळ, विजयकुमार कठाळे, गणपत केकान, कृष्णा मुंडे, सतीश वैद्य, कैलास वैद्य, दिनकर मार्गजे, योगेश चोरमारे, अक्षय भोसले, नानासाहेब भोसले, संदीप फटाले, प्रल्हाद भडांगे, रामेश्वर भडांगे,



रामेश्वर शिंदे, ज्ञानेश्वर वाडेकर, नंदू अंभोरे, प्रभाकर तांबे, ईश्वर कवडे, विठ्ठल खरात, शिवाजी कदम, रामेश्वर दराडे, राजेश कोल्हे, दिनेश, देवा ढाकणे, गणेश कडूस, सिद्धेश शेळके, किसन मुंडे, अजिंक्य शिंगणारे, इम्रान पठाण, सागर सदाफुले, अमोल साबळे, सतीश भुसारे, बाबासाहेब कायंदे, वैभव ढाकणे, विलास तुपे, विलास खैरे, बद्रीनारायण फटाले यांच्यासह शिवसेनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते.

यावेळी शेतकऱ्यांच्या वीजविषयक प्रश्नांवर तातडीने सकारात्मक निर्णय घेऊन रखडलेली सर्व कामे युद्धपातळीवर पूर्ण करावीत, अन्यथा शिवसेना शेतकऱ्यांसह रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन छेडेल असा इशाराही निवेदनाद्वारे देण्यात आला.

# गोर सेनेच्या महासंकल्प मेळाव्यास लाखोंच्या संख्येने सखल बंजारा समाजाने उपस्थित राहावे

परतूर । प्रतिनिधी पिराजी गायकवाड

गोर बंजारा समाजाच्या न्याय्य हक्क, सन्मान, अस्तित्व आणि एसटी आरक्षणाच्या मागणीला बळ देण्यासाठी येत्या १२ जुलै रोजी संभाजीनगर येथे आयोजित करण्यात आलेल्या गोर सेनेच्या महासंकल्प मेळाव्यास सखल बंजारा समाजाने लाखोंच्या संख्येने उपस्थित राहावे, असे प्रभावी आवाहन गोर सेना परतूर तालुकाध्यक्ष राम राठोड यांनी केले आहे.



देशाला स्वातंत्र्य मिळून जवळपास आठ दशके पूर्ण होत असतानाही गोर बंजारा समाजाला अपेक्षित न्याय, अधिकार आणि सन्मान अद्यापही पूर्णपणे मिळालेला नाही. महाराष्ट्रातील रोखून ठेवलेल्या एसटी आरक्षणाच्या प्रश्नावर निर्णायक लढा उभारण्यासाठी हा महासंकल्प मेळावा आयोजित करण्यात आला असून, समाजाच्या एकजुटीचे आणि शक्तीप्रदर्शनाचे हे ऐतिहासिक व्यासपीठ ठरणार असल्याचे त्यांनी सांगितले.

गोर सेना राष्ट्रीय अध्यक्ष प्रा. संदेश भाऊ चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली होणाऱ्या या महासंकल्प मेळाव्यात राज्यभरातील गोर बंजारा समाजबांधव, विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारी, आजी-माजी लोकप्रतिनिधी, सरपंच, जिल्हा परिषद व पंचायत समिती सदस्य, युवक-युवती आणि समाजप्रेमी मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत.

समाजाच्या हक्कांसाठी आता एकजुटीने उभे राहण्याची वेळ आली आहे. प्रत्येक सखल बंजारा कुटुंबाने या महासंकल्प मेळाव्यात सहभागी होऊन आपल्या अस्तित्वाचा आणि एकतेचा बुलंद आवाज राज्यभर पोहोचवावा, असे आवाहन गोर सेना परतूर तालुकाध्यक्ष राम राठोड यांनी केले आहे.

१२ जुलैचा हा महासंकल्प मेळावा गोर बंजारा समाजाच्या इतिहासातील एक महत्त्वपूर्ण टप्पा ठरेल, असा विश्वास व्यक्त करत संपूर्ण सखल बंजारा समाजाने लाखोंच्या संख्येने संभाजीनगर येथे उपस्थित राहून समाजाच्या न्याय्य हक्कांच्या लढ्याला बळ द्यावे, असे आवाहन राम राठोड यांनी केले.

# नायगाव शहरात चोरट्याचा धुमाकूळ पोलिस स्थानका जवळच पाच दुकाने फोडली

## नायगाव हादरले, व्यापाऱ्यांत प्रचंड संताप

नायगाव शहरात चोरट्यांनी अक्षरशः धुमाकूळ घालत पोलीस यंत्रणेलाच खुले आव्हान दिल्याचे चित्र समोर आले आहे. पोलीस ठाण्याच्या जवळच अंतरावर असलेल्या तब्बल पाच दुकानांचे शटर फोडून अज्ञात चोरट्यांनी शनिवार रविवार च्या मध्य रात्रीहात साफ केल्याने शहरात एकच खळबळ उडाली आहे.

भरवस्तीत, मध्यवर्ती भागात आणि पोलीस ठाण्याच्या अत्यंत जवळच ही चोरीची मालिका घडल्याने व्यापारी वर्ग संतप्त झाला असून नायगावातील कायदा-सुव्यवस्थेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, मध्यरात्रीनंतर चोरट्यांनी शहरातील मुख्य बाजारपेठेतील दुकानांना लक्ष्य केले. शटर उचकटून दुकानांत प्रवेश करत रोकड, मौल्यवान साहित्य आणि विक्रीसाठी ठेवलेल्या वस्तूंवर डल्ला मारण्यात आला. सकाळी दुकानदार दुकाने उघडण्यासाठी आले असता शटर तुटलेली, साहित्य अस्ताव्यस्त पडलेले आणि चोरी झाल्याचे लक्षात येताच व्यापाऱ्यांमध्ये भीती आणि संतापाची लाट उसळली.

विशेष म्हणजे ज्या भागात ही चोरी झाली तो परिसर पोलीस ठाण्याच्या अगदी जवळचा असल्याने चोरट्यांनी थेट पोलिसांनाच थेट आव्हान दिल्याची चर्चा शहरात रंगू लागली आहे.

विशेष म्हणजे सलग पाच दुकाने फोडली जात असताना रात्रीची पोलीस गस्त नेमकी कुठे होती, असा संतप्त सवाल व्यापारी वर्गातून उपस्थित केला जात आहे. शहराच्या मध्यभागीच चोरट्यांनी एवढ्या मोठ्या धाडसाने हात साफ केल्याने व्यापारी, नागरिक आणि रहिवाशांमध्ये असुरक्षिततेची भावना वाढीस लागली आहे.

घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा सुरू केला. परिसरातील सीसीटीव्ही फुटेज, संशयितांची हालचाल आणि इतर तांत्रिक पुराव्यांच्या आधारे चोरट्यांचा माग काढण्याचे काम सुरू असल्याचे सांगण्यात आले. मात्र, वाढत्या चोरीच्या घटनांमुळे नायगावातील व्यापारी वर्गाने पोलिसांनी तातडीने कठोर कारवाई करून शहरात रात्रीची गस्त वाढवावी, अन्यथा आंदोलनाचा इशारा दिला आहे.

व्यापाऱ्यांचा संताप; सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर

पोलीस ठाण्याच्या जवळच एक-दोन नव्हे तर थेट पाच दुकाने फोडली जाणे ही नायगावच्या सुरक्षाव्यवस्थेची लाजिरवाणी बाब असल्याची तीव्र प्रतिक्रिया व्यापारी वर्गातून उमटत आहे. चोरट्यांना जर पोलीस ठाण्याजवळच भीती उरली नसेल, तर सामान्य व्यापाऱ्यांनी सुरक्षिततेची अपेक्षा कोणाकडून करायची? असा संतप्त सवाल व्यापाऱ्यांनी उपस्थित केला आहे.

रात्रीच्या गस्तीवर प्रश्नचिन्ह

भरवस्तीत सलग पाच दुकाने फोडण्याइतका वेळ चोरट्यांना मिळतोच कसा, यावरून रात्रीच्या पोलीस गस्तीच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. शहरातील प्रमुख चौक, बाजारपेठ आणि संवेदनशील भागात पोलिसांनी गस्त अधिक कडक करावी, सीसीटीव्ही नेटवर्क मजबूत करावे आणि संशयितांवर करडी नजर ठेवावी, अशी मागणी पुढे येत आहे.

# डॉ. श्यामा प्रसाद मुखर्जी जयंती उत्साहात साजरी

तामसा ।प्रतिनिधी

हादगाव पूर्व मंडळ अंतर्गत तामसा येथे आज भारतीय जनता पार्टीच्या वतीने भारताचे महान राष्ट्रवादी नेते, भारतीय जनसंघाचे संस्थापक डॉ. श्यामा प्रसाद मुखर्जी यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

यावेळी तामसा शहराध्यक्ष शिवराजभाऊ वारकड, तालुका उपाध्यक्ष शशिकांत बंडावर, तामसा जिल्हा परिषद सर्कलचे डॉ. दीपक नाईक, कमिटीचे माजी सभापती विशाल परभणकर, तामसा जिल्हा परिषद गटाचे प्रभारी डॉ. संदीप कारंजकर, तामसा प. स. प्रभारी अर्जुन जोशी, शक्ती केंद्रप्रमुख विशाल पेंटेवाड, गंगाप्रसाद माळवे, दिनेश मेहत्रे, केदार देशमाने, राजेश उमाटे, संभाजी सरकुंडे तसेच भारतीय जनता पार्टीचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी डॉ. श्यामा प्रसाद मुखर्जी यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. यानंतर डॉ. संदीप कारंजकर यांनी डॉ. मुखर्जी यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकत, राष्ट्रीय एकात्मतेसाठी त्यांनी दिलेल्या सर्वोच्च बलिदानाची आठवण करून दिली. त्यांनी सांगितले की, एक देशात दोन विधान, दोन प्रधान आणि दोन निशाण चालणार नाही या त्यांच्या विचारांना न्याय देत ❋❋२०१९ मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली कलम ३७० हटविण्याचा ऐतिहासिक निर्णय घेण्यात आला. याबद्दल केंद्र सरकारचे अभिनंदन करण्यात आले तसेच सर्व कार्यकर्त्यांनी आपल्या मतदारसंघात अधिक जोमाने संघटनात्मक कार्य करण्याचे आवाहन करण्यात आले.

यानंतर पत्रकार अर्जुन जोशी यांनीही मार्गदर्शनपर विचार व्यक्त करून कार्यकर्त्यांना प्रेरणा दिली.कार्यक्रमाच्या शेवटी इङ--२ म्हणून कार्यरत असलेल्या सर्व पदाधिकाऱ्यांना भारतीय जनता पार्टीचे अधिकृत ओळखपत्र प्रदान करण्यात आले.

# अल्पवयीन मुलीवरील अत्याचार प्रकरणात दोन्ही आरोपी जेरबंद

## एकास न्यायालयीन कोठडी, दुसऱ्यास पोलीस कोठडी; तामसा पोलिसांची तातडीची कारवाई

**तामसा (प्रतिनिधी )**

**तामसा पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या अल्पवयीन मुलीवरील लैंगिक अत्याचार प्रकरणात पोलिसांनी जलद गतीने तपास करत दोन्ही आरोपींना अटक केली आहे. या घटनेमुळे परिसरात संताप व्यक्त होत असून आरोपींवर कठोर कारवाई करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.**

या प्रकरणी गुन्हा रजिस्टर क्रमांक ११६/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता (इछड) कलम ६४, ७५, ३(५) तसेच बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक (झजउडज) अधिनियमातील कलम ४, ६ व १२ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस सूत्रांकडून प्राप्त माहितीनुसार, मोहमद उमर अब्दुल्ला अजीज (वय २८) व मोहम्मद साद अब्दुल अजीज (वय २०, दोघेही रा. हिमायतनगर) यांना तामसा पोलिसांनी ५ जुलै २०२६ रोजी दुपारी साडेदोन वाजता अटक केली. अटकेनंतर दोन्ही आरोपींना विशेष न्यायालय, नांदेड येथे हजर करण्यात आले.

सुनावणीदरम्यान न्यायालयाने आरोपी मोहमद उमर अब्दुल्ला अजीज यास न्यायालयीन कोठडी सुनावत नांदेड कारागृहात रवानगी करण्याचे आदेश दिले. तर दुसरा आरोपी मोहम्मद साद अब्दुल अजीज यास पुढील तपासासाठी ७ जुलै २०२६ पर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.

दरम्यान, या गंभीर प्रकरणाचा पुढील तपास तामसा पोलीस करीत असून तपासातून आणखी महत्त्वाची माहिती समोर येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. अल्पवयीन मुलीच्या सुरक्षेशी संबंधित या घटनेने नागरिकांमध्ये चिंता व्यक्त होत असून दोषींना कठोर शिक्षा व्हावी, अशी मागणी विविध स्तरांतून होत आहे.

तामसा पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या अल्पवयीन मुलीवरील लैंगिक अत्याचार प्रकरणात पोलिसांनी जलद गतीने तपास करत दोन्ही आरोपींना अटक केली आहे. या घटनेमुळे परिसरात संताप व्यक्त होत असून आरोपींवर कठोर कारवाई करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

# पाऊस आणि ग्रामीण रस्ते: दरवर्षी तीच कहाणी; किरोडावासीयांचा प्रशासनावर संताप

## खड्डे आणि चिखलामुळे शालेय विद्यार्थी, रुग्णांचे प्रचंड हाल; कायमस्वरूपी रस्त्याची गावकऱ्यांची मागणी

लोहा ।प्रतिनिधी

लोहा: पावसाळा सुरू होताच लोहा तालुक्यातील ग्रामीण भागातील रस्त्यांची अक्षरशः चाळण झाली असून, त्यांची दयनीय अवस्था पुन्हा एकदा चव्हाट्यावर आली आहे. दरवर्षी पावसाळ्यात रस्त्यांची वाट लागणे ही आता नित्याचीच बाब झाली आहे. खड्डे, चिखल आणि त्यामुळे उडणारा वाहतुकीचा बोजवारा यामुळे नागरिकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे. दरवर्षी तीच परिस्थिती उद्भवत असल्याने आता ग्रामस्थांच्या संयमाचा बांध फुटला असून, प्रशासन आणि लोकप्रतिनिधींच्या नाकर्तेपणाबद्दल तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.



लोहा-कंधार या मुख्य रस्त्यापासून अवघ्या दीड किलोमीटर अंतरावर असलेल्या किरोडा गावाकडे जाणाऱ्या रस्त्याची अवस्था अत्यंत बिकट झाली आहे. पावसामुळे या रस्त्यावर सर्वत्र चिखलाचे साम्राज्य पसरले असून जागोजागी मोठे खड्डे पडले आहेत. परिणामी, दुचाकीस्वार, वाहनचालक आणि पायी प्रवास करणाऱ्या ग्रामस्थांना अक्षरशः कसरत करत मार्ग काढावा लागत आहे.या खराब रस्त्याचा सर्वाधिक फटका शाळकरी विद्यार्थी, वृद्ध नागरिक, महिला आणि आजारी रुग्णांना बसत आहे. चिमुकल्या विद्यार्थ्यांना दररोज चिखलातून पायपीट करत शाळा गाठावी लागत आहे. तसेच, गावात एखादी वैद्यकीय आणीबाणी उद्भवल्यास रुग्णवाहिकेलाही गावात पोहोचणे कठीण होत असल्याची गंभीर तक्रार ग्रामस्थांनी केली आहे.

गेल्या अनेक वर्षांपासून सर्व ऋतूंमध्ये टिकेल असा पक्का रस्ता बनवण्याची मागणी ग्रामस्थ करत आहेत. मात्र, प्रशासनाकडून सातत्याने याकडे दुर्लक्ष केले जात आहे. त्यामुळे 'आम्ही खरंच लोकशाहीत राहतो की नाही?' असा संतप्त सवाल किरोडा येथील ग्रामस्थांनी उपस्थित केला आहे. या समस्येची तत्काळ दखल घेऊन किरोडा गावाकडे जाणाऱ्या रस्त्याची त्वरित दुरुस्ती करावी आणि हा रस्ता कायमस्वरूपी सुस्थितीत आणावा, अशी जोरदार मागणी ग्रामस्थांनी केली आहे. मागणी मान्य न झाल्यास आंदोलनाचा इशाराही देण्यात आला आहे.

# बरबडा-बिलोली बससेवा अनेक वर्षांनंतर पुन्हा सुरू

## विद्यार्थी व नागरिकांना मोठा दिलासा..

नायगाव ।प्रतिनिधी

तालुक्यातील अनेक वर्षांपासून बंद असलेली बरबडा-बिलोली बससेवा आजपासून पुन्हा सुरू करण्यात आली आहे. ही बससेवा सुरू करण्यासाठी वसंत सुगावे , विश्वनाथ बडूरे यांनी सातत्याने पाठपुरावा व प्रयत्न केले. त्यांच्या प्रयत्नांना अखेर यश मिळाल्याने परिसरातील नागरिकांमध्ये समाधान व्यक्त होत आहे.आज सोमवार दिनांक ०६ रोजी या बससेवेला प्रारंभ झाला असून गावातील नागरिकांचे यांच्या हस्ते नारळ



फोडून सुरुवात करण्यात आली आहे.

या बससेवेचा सर्वाधिक लाभ बरबडा, पाटोदा,कहाळा ,कुशणूर, घुंगराळा, नायगाव नरसी या गावांतील शेकडो विद्यार्थी, नोकरदार तसेच सर्वसामान्य नागरिकांना होणार आहे. तालुक्याच्या ठिकाणी शिक्षण, शासकीय कामे, आरोग्य सेवा आणि दैनंदिन प्रवासासाठी ही बस अत्यंत उपयुक्त ठरणार आहे.

ही बस दररोज सकाळी ६.१५ वाजता बरबडा येथून सुटून ७.३० वाजता बिलोली येथे पोहोचेल. तसेच सायंकाळी ६.१५ वाजता बिलोली येथून सुटून ७.३० वाजता बरबडा येथे मुक्कामी पोहोचेल.

३० वर्षांपासून प्रलंबित असलेली ही मागणी पूर्ण झाल्याने परिसरातील नागरिकांनी आनंद व्यक्त करत संबंधितांचे आभार मानले आहेत.

# स्वारातीम विद्यापीठात श्री संत गुलाबराव महाराज जयंती उत्साहात साजरी

नांदेड जिल्हा ।प्रतिनिधी

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या प्रशासकीय इमारतीतील स्वागत कक्ष येथे आज सोमवार, दि.०६ जुलै, २०२६ रोजी श्री संत गुलाबराव महाराज यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. या प्रसंगी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांच्या हस्ते श्री संत गुलाबराव महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.



यावेळी प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक हुशारसिंग साबळे, नवोपक्रम, नवसंशोधन व

साहचर्य मंडळाचे संचालक डॉ.शैलेश वाढेर, ज्ञान स्त्रोत केंद्राचे संचालक डॉ. जगदीश कुलकर्णी, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉ.मारुती गायकवाड,कार्यकारी अभियंता तानाजी हुस्सेकर, उपकुलसचिव डॉ. रवि सरोदे, जनसंपर्क अधिकारी डॉ. अशोक कदम, संतोष चव्हाण, गोविंद हंबर्डे, तुकाराम बारसे, दादाराव हंबर्डे यांची प्रमुख उपस्थिती होती.

याप्रसंगी विद्यापीठातील प्राध्यापक, अधिकारी, कर्मचारी यांच्यासह विद्यार्थ्यांनी श्री संत गुलाबराव महाराज यांच्या

प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले.

# अहो आश्चर्यम..! तामसा-नांदेड मार्गावर एसटीचा दुष्काळ; प्रवासी मात्र अवैध वाहतुकीच्या भरवशावर

तामसा ।प्रतिनिधी

तामसा-नांदेड या सुमारे ५० किलोमीटर अंतराच्या अत्यंत महत्त्वाच्या मार्गावर महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाची (एसटी) नियमित बससेवा नसल्याने शालेय विद्यार्थी, महिला, ज्येष्ठ नागरिक, नोकरदार आणि व्यापाऱ्यांना दररोज मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे.

तामसा हे नांदेड जिल्ह्यातील प्रमुख व मोठ्या बाजारपेठांपैकी एक असून शहराची लोकसंख्या जवळपास २५ हजार आहे. याशिवाय तामसा हे सर्कलचे ठिकाण असल्याने परिसरातील सुमारे ५० गावांतील नागरिकांचा दैनंदिन संपर्क या शहराशी असतो. तरीही तामसा-नांदेड मार्गावर नियमित व पुरेशी एसटी बससेवा उपलब्ध नसल्याचे वास्तव आहे.

सकाळच्या वेळेत केवळ कामारी व लातूरकडे जाणाऱ्या १बस असल्याने नांदेडकडे जाणाऱ्या प्रवाशांची मोठी गैरसोय होते. कार्यालयीन वेळ, शाळा-महाविद्यालयांची वेळ आणि अन्य कामांसाठी नागरिकांना वेळेवर सार्वजनिक वाहतूक मिळत नसल्याने नाईलाजाने अवैध प्रवासी वाहतुकीचा आधार घ्यावा लागतो.

विशेष म्हणजे या मार्गावर दररोज सुमारे दहा लक्झरी वाहने अवैध प्रवासी वाहतूक करतात. प्रत्येक वाहनाच्या दिवसातून दोन फेऱ्या होत असून अनेकदा क्षमतेपेक्षा जास्त प्रवासी भरून ओव्हरलोड वाहतूक केली जाते. एवढ्या मोठ्या प्रमाणात प्रवासी उपलब्ध असताना एसटी महामंडळाला प्रवासी मिळत नाहीत, असा दावा कसा केला जातो, हा प्रश्न उपस्थित होत आहे.स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, एसटी महामंडळाकडून एखाद्या मार्गावर केवळ दोन-तीन दिवस बस चालवली जाते आणि त्यानंतर प्रवासी मिळत नाहीत या कारणावरून ती सेवा बंद केली जाते. मात्र नियमित, वेळापत्रकानुसार आणि सातत्याने बससेवा दिल्यास या मार्गावर प्रवाशांची कमतरता भासणार नाही, असा विश्वास नागरिकांनी व्यक्त केला आहे.

तामसा-नांदेड मार्गावरील वाढती अवैध वाहतूक, प्रवाशांची गैरसोय आणि एसटी महामंडळाचे नियोजन याबाबत संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांनी गांभीर्याने आत्मपरीक्षण करून नियमित बससेवा तातडीने सुरू करावी, अशी मागणी नागरिकांकडून जोर धरत आहे.

तामसा-नांदेड या सुमारे ५० किलोमीटर अंतराच्या अत्यंत महत्त्वाच्या मार्गावर महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाची (एसटी) नियमित बससेवा नसल्याने शालेय विद्यार्थी, महिला, ज्येष्ठ नागरिक, नोकरदार आणि व्यापाऱ्यांना दररोज मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे.

# सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक पदी शेख इब्राहिम शेख इस्माईल यांची पदोन्नती..



नवीन नांदेड - ग्रामीण पोलीस स्टेशन येथे कार्यरत शेख इब्राहिम शेख इस्माईल यांची सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक पदी पदोन्नती झाल्याबद्दल ग्रामीण पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्या हस्ते फित व स्टार लावुन अभिनंदन करण्यात आले यावेळी उपस्थित पोलीस अंमलदार यांनी अभिनंदन केले.

जिल्हा पोलीस अधीक्षक डॉ.निलाभ रोहन यांच्ये आदेश ३ जुलै रोजी काढलेल्या आदेशानुसार जिल्ह्यातील १५ जमादाराना सहायक पोलीस उपनिरीक्षक पदी पदोन्नती देण्यात आली होती यात ग्रामीण पोलीस स्टेशन येथे कार्यरत शेख इब्राहिम शेख इस्माईल यांना पदोन्नती मिळाल्याबद्दल ६ जुलै रोजी ग्रामीण पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्या हस्ते स्टार व फित लावून बहाल केली.

यावेळी उपनिरीक्षक ज्ञानेश्वर भोसले, बेग,प्रविण साळुंके यांच्या सह ठाण्यातील पोलीस अमलदार व महिला पोलिस कर्मचारी व पत्रकार रमेश ठाकूर,सारंग नेरलकर,संग्राम मोरे यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.